तुमच्या जिभेला द्या चव...आणि भोजनाचा घ्या आनंद...
स्वादिष्ट.. रुचकर राजस्थानी थाळी
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर. फोन : 2327060, 9850799850



संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी छोले भटूरे
Sambar PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०४.११.२०२५ | अंक नं. १७७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

सर्व दागिन्यांची प्रतीग्रॅम घडणावळ ₹ 888/-*
डबल फायदा
+ जेवढ्या वजनाचे सोने तेवढ्या वजनाची चांदी
चक्क फ्री*
चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

## शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीतून जास्त नफ्याच्या आमिषाने नगरमधील नोकरदाराची केली तब्बल ३ कोटींची फसवणूक

नगर - शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीतून जास्त नफ्याचे आमिष दाखवून नगरमधील एका नोकरदाराची तब्बल ३ कोटी ३ लाख १५ हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे. फसवणुकीची ही घटना २ ऑगस्ट २०२५ ते १ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत घडली असून या प्रकरणी ३ नोव्हेंबर रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात ३ जणांसह काही अनोळखी व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सावेडी उपनगरातील रासनेनगर मध्ये राहणाऱ्या ६१ वर्षीय नोकरदाराने तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे शेअर मार्केट बाबत सोशल मिडीयावर माहिती घेत असताना त्यांची साक्षी गुप्ता, जितेन दोषी व विक्रम शहा (पूर्ण नाव व पत्ते माहित नाहीत) यांच्याशी सोशल मिडीयावर ओळख झाली. त्या तिघांनी त्यांना 1999 ENM MOVING FORWORD तसेच 701 VIP 141 SERVICE GROUP अशा वेगवेगळ्या व्हाटसअप ग्रुप मध्ये घेतले. त्या ग्रुपवर आरोपी हितेन दोषी व इतरांनी शेअर मार्केट बाबत माहिती देत इतर ग्रुप सदस्यांना किती व कसा नफा झाला, हे पटवून देत फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर फिर्यादी यांना एक लिंक पाठवून ENAMC हे ॲप त्यांच्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करायला लावले. या ॲपच्या माध्यमातून फिर्यादीला वेगवेगळ्या बँक खात्यात पैसे पाठवायला सांगितले. फिर्यादी यांनी २ ऑगस्ट २०२५ ते १ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत तब्बल ३ कोटी ३ लाख १५ हजार रुपये हे आरोपींनी सांगितलेल्या विविध बँक खात्यावर पाठविले. त्यातून शेअर्स आणि आयपीओ खरेदी केल्याचे फिर्यादीस भासविले. फिर्यादी यांनी गुंतवणूक केलेली रक्कम आणि त्यातून मिळणारा नफा याबाबत आरोपींना विचारणा केली असता नफ्यासह गुंतवलेली रक्कम पाहिजे असल्यास कंपनीला सर्व्हिस चार्ज द्यावा लागेल असे म्हणत आणखी पैशांची मागणी केली. ही निव्वळ बनवा बनवी असल्याचे फिर्यादीच्या आले. आपली मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यावर त्यांनी ३ नोव्हेंबर रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी साक्षी गुप्ता, जितेन दोषी व विक्रम शहा (पूर्ण नाव व पत्ते माहित नाहीत) यांच्यासह इतर अनोळखी आरोपींच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३१६ (२), ३३६ (२), ३३८, ३३६ (३), ३४० (२), ३ (५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास स.पो.नि. गोंटला हे करत आहेत.

## इंस्टाग्रामवर व्हिडिओ टाकून धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी नगरमध्ये गुन्हा दाखल

नगर - इंस्टाग्राम या सोशल मिडिया साईटवर मुस्लिम धर्मियांचा पवित्र ग्रंथ असलेल्या 'कुराण'ची पाने फाडून त्याचा व्हिडिओ तयार करून आक्षेपार्ह मजकूर असलेला तो व्हिडीओ पोस्ट करत धार्मिक भावना दुखावण्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत साहेबान अन्सार जहागीरदार (वय ३५, रा.बेलदार गल्ली, सर्जेपुरा रोड) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे ३ नोव्हेंबर रोजी रात्री त्यांच्या मोबाईलमध्ये इंस्टाग्रामवर व्हिडीओ व रील्स पाहत असताना गुरु १०० हा आय डी असलेल्या इसमाने मुस्लिम धर्मियांचा पवित्र ग्रंथ असलेल्या 'कुराण'ची पाने फाडतानाचा व्हिडीओ काढून त्यावर अश्लील व आक्षेपार्ह टिपण्णी करणारा व्हिडीओ त्याच्या आयडीवरून प्रसारित केल्याचे दिसून आले. त्यामुळे फिर्यादी तसेच मुस्लिम धर्मियांच्या भावना दुखावल्या गेल्या. हा व्हिडीओ पाहून फिर्यादी यांनी रात्रीच तोफखाना पोलिस स्टेशन गाठून पोलिसांना सदर प्रकार सांगितला. पोलिसांनी त्यांची फिर्याद घेत गुरु १०० नावाच्या इंस्टाग्राम आयडी धारकाविरुद्ध बीएनएस कलम २९९ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

घरपोहोच नर्सिंग सेवा
बेडसोर, डायबीटीस न भरणाऱ्या जखमा योग्य पध्दतीने ड्रेसींग व नर्सिंग केअर केली जाईल.
7028986048

## सावेडी उपनगरात महिलेच्या गळ्यातील मंगळसुत्र हिसकावले

### चेन स्नॅचिंगच्या घटना थांबता थांबेनात, पोलिसांना चोरटे सापडेनात

नगर - नगर शहराच्या मध्यवस्तीत तसेच उपनगरी भागात चेन स्नॅचिंग करणाऱ्या चोरट्यांनी उच्छाद घातला आहे. विनायकनगर, प्रोफेसर कॉलनी चौक, शहरातील माणिक चौक या ३ घटना ताज्या असताना आणि त्यांचा कसलाही तपास लागलेला नसताना सावेडी उपनगरात पाईपलाईन रोड वर ३ नोव्हेंबर रोजी पुन्हा भर दुपारी १.३० च्या सुमारास चेन स्नॅचिंग झाली आहे. मोपेड वर चाललेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र पाठीमागून मोटारसायकलवर आलेल्या एका चोरट्याने हिसका मारून चोरून नेले आहे.

याबाबत अर्चना अमोल पडसे (मूळ रा. नातेपुते, ता. माळशिरस, जि. सोलापूर, हल्ली रा. अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या ३ नोव्हेंबर रोजी दुपारी १.३० च्या सुमारास पाईपलाईन रोड वरील वाणीनगर कमानी जवळ असणाऱ्या मेडिकल स्टोअर मधून त्यांच्या कडील मोपेड वर घरी जात असताना मल्हार रेसिडेन्सी समोर रस्त्यावरील गतीरोधकाजवळ त्यांच्या मोपेड चा वेग कमी झाला. त्याच वेळी पाठीमागून मोटारसायकलवर एक इसम आला व त्याने मोटारसायकल फिर्यादी यांच्या मोपेड जवळ आणून त्यांच्या गळ्यातील ७० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसुत्र हिसका मारून तोडले व ते घेवून भरधाव वेगात तेथून पसार झाला.

याबाबत अर्चना पडसे यांनी तोफखाना पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळताच शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक दिलीप टिपरसे, तोफखाना पोलिस ठाण्याचे पो.नि. आनंद कोकरे यांच्या सह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. त्यानंतर पडसे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०९ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### पंधरा ते वीस दिवसांतील चेन स्नॅचिंगची चौथी घटना

चेन स्नॅचिंग होण्याची गेल्या १५ - २० दिवसांतील ही चौथी घटना आहे. १० ऑक्टोबर रोजी सकाळीच विनायकनगरमध्ये पत्ता विचारण्याच्या बहाण्याने जवळ येवून महिलेच्या गळ्यातील मंगळसुत्र हिसकावले गेले होते. त्या नंतर २८ ऑक्टोबर रोजी सकाळी प्रोफेसर कॉलनी चौका जवळील रावसाहेब पटवर्धन स्मारकासमोर मॉर्निंग वॉक ला गेलेल्या महिलेचे मंगळसुत्र हिसकावले गेले. ३१ ऑक्टोबर रोजी रात्री ८.४० च्या सुमारास तर कोतवाली पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर माणिक चौकात चेन स्नॅचिंग झाले होते. त्यानंतर ३ नोव्हेंबर रोजी भर दुपारी सावेडी उपनगरात चेन स्नॅचिंग झाले. वारंवार या घटना घडत असताना तोफखाना व कोतवाली पोलिसांना चेन स्नॅचिंग करणारे चोरटे सापडत नसल्याने महिला वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पाहिजेत
• Tele Caller - 2 (विवाहित महिला- वय २२ ते ३२ वर्ष, शिक्षण- ग्रॅज्युएट पाहिजे)
• Marketing Persons - 1 (स्वतःची टु व्हीलर असणे आवश्यक)
• Technical ITI / Diploma/ Mechanical Engg - 1
• Accountant - 1 (महिला) (एक्सपिरीयन्स असलेल्यांना प्राधान्य)
सर्व प्रकारच्या बांधकाम मशिनरी व स्कॅफोल्डिंग इक्विपमेंटसचे उत्पादक आणि विक्रेते
Interview Time : 11am to 4pm
प्लॉट नं.ए-६/३, एल टी एल के, गेट नं. ३ समोर, स्टेट बँक ऑफ इंडिया रोड, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर ४१४१११
9146222207

कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
एक किलो मागे एक कोलगेट ब्रश फ्री..फ्री..
रत्नकमल चहा
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स
चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.

## जेवणाचे बिल मागितल्याच्या रागातून हॉटेल व्यवसायिकावर हल्ला

नगर - जेवणाचे बिल मागितल्याच्या रागातून हॉटेल व्यावसायिकावर एका ग्राहकाने लोखंडी रॉडने हल्ला केल्याची घटना २ नोव्हेंबर रोजी रात्री पावणे नऊच्या सुमारास नगर-कल्याण महामार्गावरील गणेशनगर भागात घडली. शोभराज मुरलीधर वांढेकर (वय २७, रा. मोहज, ता. पाथर्डी) असे जखमी व्यावसायिकाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात दत्ता सोनवणे (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी कल्याण रस्त्यावर हॉटेल भावकी या नावाने मागील वर्षीपासून हॉटेल व्यवसाय करीत आहेत. त्यांच्या हॉटेलवर नियमितपणे जेवणासाठी येणारा दत्ता सोनवणे हा नेहमी बिल देताना वाद घालून उशीर करत असे तसेच काही उधारीचे पैसे बाकी होते.

२ नोव्हेंबर रोजी रात्री ८.४५ वाजता दत्ता हा त्याच्या दोन मित्रांसह हॉटेलवर आला होता. त्यावेळी फिर्यादी यांनी त्याला सांगितले की, तुम्ही वारंवार बिल न देता वाद घालता, माझ्या हॉटेलवर जेवण करू नका, असे म्हणताच दत्ता संतापला व शिवीगाळ करत वाद घातला. त्याने आपल्या कारमधील लोखंडी रॉड काढून फिर्यादीच्या डोक्यात प्रहार केला. यात फिर्यादी जखमी झाले. जखमी अवस्थेत फिर्यादीने कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. दत्ता सोनवणे विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

varshaplastics.com
Varsha Real Product, Real Value
अटूट रिश्ता जिंदगी भर का
मजबूत व टिकाऊ उत्पादनांची विश्वासार्ह श्रृंखला!
Unbreakable Household | Garden Pipes | Furniture
HDPE Pipes | Sprinklers | Cleaning Products
200+ PRODUCT RANGE
- AUTHORISED DISTRIBUTOR -
M/s. Abhay Sales Corporation & Hardware
In front of Sarvodaya Colony, beside Gajanan Hospital, Satbhai Mala, Delhi Gate, Ahilyanagar.
Office Mob. 9145008009/9822542011

FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT
COURSE DETAILS
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING | ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
100% JOB ASSISTANCE
DiSHA® An ISO 9001:2015 Certified COMPUTER INSTITUTE
IN JUST 17900/-
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 — 9371051769
Old ST stand Branch: Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001 — 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 — 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक के. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# घर फोडून सोन्या चांदीचे दागिन्यांची चोरी

नगर - वृद्ध शेतकऱ्याच्या घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा तोडून आत प्रवेश करत घरातील कपाटात ठेवलेले ४३ हजार ९०० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील पिंपळगाव कौडा येथे ३ नोव्हेंबर रोजी सकाळी उघडकीस आली आहे.

याबाबत अमोल साहेबराव पाचरे (वय ३६, रा. केडगाव) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे आजोबा रंगनाथ मारुती पाचरे हे पिंपळगाव कौडा येथे राहतात. त्यांच्या घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला आणि घरात सर्वत्र उचकापाचक करत कपाटातील ४३ हजार ९०० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (अ), ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# केडगाव उपनगरामधील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा; कार्यवाही न झाल्यास महापालिकेत मोकाट कुत्रे सोडणार

## सुमित लोंढे यांचे महापालिका आयुक्तांना निवेदन

नगर - केडगाव उपनगरात सध्या मोकाट कुत्र्यांचा अक्षरशः उच्छाद माजला असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनात त्रास वाढला आहे. केडगाव उपनगर, रेल्वे स्टेशन परिसर, दूधसागर, इंदिरानगर, हनुमाननगर, मोहिनीनगर, कांबळे मळा, कायनेटिक चौक या परिसरात मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. रात्रीच्या वेळी हे कुत्रे नागरिकांच्या मागे धावणे, रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकीस्वारांना घाबरवणे, लहान मुलांच्या अंगावर झेप घेणे, तसेच रात्री सतत भुंकणे यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. याबाबत सुमित संजय लोंढे यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची, त्यांचे निर्बिजीकरण करून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याची मागणी केली आहे. मोकाट कुत्र्यांमुळे नागरिक भितीच्या सावटाखाली असल्याबाबत त्यांनी मनपा आयुक्तांचे लक्ष वेधले.



सुमित संजय लोंढे यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन केडगावमधील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची, त्यांचे निर्बिजीकरण करून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याची मागणी केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केडगाव उपनगरात अनेक नागरिकांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना घडलेल्या आहेत. रस्त्यांवरील कचऱ्यात हे कुत्रे घोटाळून तो पसरवतात, त्यामुळे अस्वच्छता वाढते. यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होत असून, नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

मनपा प्रशासनाकडून यापूर्वीही काही प्रमाणात कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यात आले असले तरी ते अपुरे ठरले आहे. शहर व उपनगरातील वाढती लोकसंख्या आणि कचऱ्याचे अनियंत्रित व्यवस्थापन यामुळे मोकाट कुत्र्यांची वाढ होत असल्याचेही लोंढे यांनी निदर्शनास आणून दिले. जर महापालिकेने तातडीने या संदर्भात कारवाई केली नाही, तर आम्ही संबंधित कुत्रे थेट महापालिका कार्यालयात आणून सोडणार आहोत. प्रशासनाने जबाबदारी टाळू नये, ही लोकांच्या सुरक्षेची बाब असल्याचा इशारा त्यांनी दिला.

मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून नियमित निर्बिजीकरण मोहिम, रस्त्यांवरील कचरा व्यवस्थापन सुधारणा, प्राणीसंवर्धन केंद्रांमार्फत आश्रय व्यवस्था या तातडीच्या उपायांची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे.

## विजय शंकर मंदिरात ५ नोव्हेंबर रोजी 'कार्तिकस्वामी दर्शन'



नगर - ५ नोव्हेंबर रोजी दिवसभर पर्यंत कार्तिक स्वामींचे दर्शनासाठी मंदिर खुले आहे. यावेळी दीपोत्सवही साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती जनरल पोस्ट ऑफिस समोरील श्री विजय शंकर मंदिराचे पुजारी राजेंद्र राजमाने यांनी दिली.

कार्तिक स्वामींचे दर्शन वर्षातून एकाच दिवशी कार्तिकी पौर्णिमेला घेता येते. महिला भाविकांनाही ही संधी मिळत असल्याने या दिवशी कार्तिक स्वामींच्या दर्शनाचा लाभ घ्यावा. असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, कार्तिकी पौर्णिमेनिमित्त मंदिरात कार्तिक स्वामी जयंती निमित्त आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे.

## त्रिपुरी पौर्णिमेनिमत्त ५ नोव्हेंबर रोजी 'त्रिवेणी कला दीपोत्सवा'चे आयोजन

नगर - त्रिपुरी पौर्णिमेनिमित्त आय एम एस व कोहिनूर मॉल यांच्या संयुक्त विद्यमाने ५ नोव्हेंबर रोजी सायं. ५.३० त्रिवेणी कला दीपोत्सव या संगीतमय संध्याकाळी गायन, वादन व नृत्य या तिन्ही कला एकाच वेळी सादर होणार आहे

आय एम एस च्या भरतनाट्यम व कथक नृत्याच्या विद्यार्थिनींच्या सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात होईल. अन्वी, दुर्वा, ज्ञानदा, प्रांजल, वेदिका, समृद्धी, जान्हवी, ईशिका, ईशिता, मृणाल, मेघना, प्रिया, विद्या, अथिरा, स्निका, ऋत्वि, अश्विनी, राणी, भाग्यश्री श्रुती, रिया, राजनंदिनी, सानवी, देवीजा, सिद्धेश्वरी, आदिरा ह्या कलाकार आपली नृत्यकला सादर करतील. त्यानंतर मुलांशु (नादब्रह्म संगीतालय), वैष्णवी (सरस्वती संगीतालय), शताक्षी (अनाहत संगीत अकॅडमी) हे गायन कलाकार आपली कला सादर करतील. प्रसाद सुवर्णपाठकी (तबला) व हर्षल सर (बासरी) यांची जुगलबंदी सादर होईल. कल्याण मुरकुटे साथसांगत करतील. कार्यक्रमाची सांगता भरतनाट्यम व कथक फ्युजन आणि दीपनृत्याने होईल.

या विनामूल्य कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांनी उपस्थित रहावे व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन अकॅडेमी च्या समन्वयक डॉ. ऋचा तांदुळवाडकर यांनी केले आहे.


## नागरदेवळे येथून मालवाहू टेम्पोची चोरी

नगर - शहराजवळील नागरदेवळे येथून अशोक लेलंड कंपनीचा मालवाहू टेम्पो अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना २१ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर या कालावधीत घडली आहे.

याबाबत अजमत इनायत सय्यद (रा. दर्गादायरा रोड, मुकुंदनगर) यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## श्रीमती कमलबाई बलदोटा यांचे हृदयविकाराने निधन

नगर - येथील हुंडेकरी लॉन मागील विठ्ठल हाऊसिंग सोसायटी नंदनवननगर येथील रहिवासी श्रीमती कलमबाई मनसुखलाल बलदोटा (वय ८५) (देवीनिमगाववाला, कडा) यांचे ३ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुरेश, विनोद यांच्या त्या मातोश्री होत. हिरालाल, संपत, दिलीप, राहुल यांच्या चुलती होत.

# पथदिवे व गतीरोधक नसल्याने गुलमोहर रस्त्यावर होतात अपघात

## महानगरपालिका आयुक्तांना निवेदन

नगर - शहरातील गुलमोहर रोड हा वाहतुकीचा गजबजलेला व नागरिकांच्या दैनंदिन प्रवासातील एक महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, या रस्त्यावर पथदिवे व गतीरोधक नसल्याने सतत अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी भाजप युवा मोर्चाचे शहर जिल्हा सरचिटणीस आकाश सोनवणे यांनी केली असून, त्यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

गुलमोहर रोड हा रहदारी असलेला मार्ग असून, या परिसरात व्यापारी, शैक्षणिक संस्था व निवासी वसाहती मोठ्या प्रमाणावर आहेत. रात्रीच्या वेळी पथदिवे नसल्याने संपूर्ण परिसर अंधारमय होतो. त्यामुळे महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि कार्यालयातून घरी परतणारे प्रवासी यांना जिव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो.


शहरातील गुलमोहर रोड हा वाहतुकीचा गजबजलेला व नागरिकांच्या दैनंदिन प्रवासातील एक महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, या रस्त्यावर पथदिवे व गतीरोधक नसल्याने सतत अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी भाजप युवा मोर्चाचे शहर जिल्हा सरचिटणीस आकाश सोनवणे यांनी केली असून, त्यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

गतीरोधक नसल्यामुळे वाहने सुसाट वेगाने धावत असतात, परिणामी लहान-मोठे अपघात वारंवार घडत आहेत. प्रशासनाने योग्य उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. गुलमोहर रोडवर विशेषतः पोलीस चौकीसमोर आणि गरजेच्या ठिकाणी पथदिवे तातडीने बसवावेत, मानांकनानुसार गतीरोधक बसवावेत व त्यावर पांढऱ्या पट्ट्यांचे रंगकाम करून ते स्पष्ट देखील अशी व्यवस्था करावी. या उपायोजनामुळे पदचारी व नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित होईल तसेच वाहतूक शिस्तबद्ध होणार असल्याने यासंदर्भात तातडीने कारवाई करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

जनतेची सुरक्षा हा सर्वोच्च प्राधान्याचा विषय आहे. जर मनपा प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर आम्ही प्रसंगी प्रशासनाला धारेवर धरू. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत कोणतीही तडजोड होणार नाही. प्रभाग क्रमांक तीनमधील नागरिकांकडून या समस्येबाबत वारंवार तक्रारी येत असून, रात्री अपघातांची संख्या वाढल्याने नागरिकांचा संयम संपत चालला असून तातडीने सदरचा प्रश्न सोडविण्यात यावा, अशी मागणी आकाश सोनवणे यांनी केली आहे.

## लिलाबाई साखला यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील लिलाबाई मुकुंदलाल साखला (वय ८४) यांचे ३ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर जुन्नर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. माजी उपनगराध्यक्ष संजय साखला यांच्या त्या मातोश्री होत.

## भूतकरवाडी येथील योगेश जगताप यांचे निधन



नगर - भूतकरवाडी येथील रहिवासी योगेश बाळासाहेब जगताप (वय ३७) यांचे नुकतेच दुःखद निधन झाले.

त्यांच्या मागे आई, भाऊ, भावजयी असा परिवार आहे. त्यांच्यावर नालेगाव येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## इंद्रा वाघमारे यांचे दु:खद निधन



भिंगार - धनगरगल्ली येथील रहिवासी इंद्रा सखाराम वाघमारे (वय ५५) यांचे २८ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, १ मुलगा, आई, ३ भाऊ, भावजया, १ बहीण असा परिवार आहे.

## साहेबराव गायकवाड यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - टॅक्सी युनियनचे माजी अध्यक्ष साहेबराव रामराव गायकवाड (वय ६३) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात १ भाऊ, १ मुलगा, २ मुली, सुन, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भगतसिंग चौकातील रिक्षाचालक बाळासाहेब गायकवाड यांचे थोरले बंधू, अशोक बँकेचे कर्मचारी सुधीर गायकवाड यांचे वडील तर सुनिल गायकवाड यांचे चुलते होत.



## राजेंद्र पाटणी यांचे निधन

छत्रपती संभाजीगर - उमापूर (ता.गेवराई, जि.बीड) येथील व्यापारी राजेंद्र भगवानदास पाटणी (५८) यांचे २ नोव्हेंबर रोजी सकाळी २.१० समाधी मरण गुजरात येथील पावागढ सिध्दक्षेत्र येथे आचार्य मयंक सागरजी महाराज ससंघ यांच्या सानिध्यात समतापूर्वक समाधी मरण झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, असा परिवार आहे. सत्यम भैय्या, अभिजीत व मोहित यांचे वडील होत.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# निवृत्त लष्करी अधिकाऱ्याच्या घरात चोरी; सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोकड लंपास

## नक्षत्र लॉनच्या पाठीमागील बुरुडगाव रोडवर घडलेली घटना; ९ लाख ३९ हजारांचा ऐवज पळविला

नगर - दिवाळी निमित्त बाहेरगावी गेलेल्या सेवानिवृत्त लष्करी सुभेदार यांच्या घरात चोरट्यांनी मोठी चोरी करत सोन्या चांदीचे दागिने, रोकड असा ९ लाख ३९ हजारांचा ऐवज लंपास केला आहे. ही घटना २६ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ ते २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३२ या कालावधीत शहरातील बुरूडगाव रोडवरील नक्षत्र लाँनच्या पाठीमागे घडली आहे.

याबाबत पांडुरंग नागू धोत्रे (वय ६७, रा. नक्षत्र लॉनच्या पाठीमागे, बुरूडगाव रोड) यांनी ३ नोव्हेंबर रोजी दुपारी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांच्या पत्नी हे दोघेच नगरमध्ये राहतात तर त्यांचा मुलगा व सून हे बावधन, पुणे येथे वास्तव्यास आहेत. फिर्यादी व त्यांच्या पत्नी हे २६ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घरातील लाईट चालू ठेवून घराला कुलूप लावून त्यांच्या मुलाकडे पुण्याला गेले होते.

२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३२ च्या सुमारास त्यांच्या शेजारी राहणाऱ्या महिलेने त्यांना फोन करून तुमच्या घरातील लाईट बंद असल्याचे कळविले. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना आमच्या घरी जावून पहा लाईट बंद का झाली असे सांगितले. त्यानंतर शेजारील महिला त्यांच्या घरी गेली असता त्यांना घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा व कुलूप तुटलेले दिसले. तसेच घरात उचकापाचक झालेली आणि साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. ही बाब त्यांनी फिर्यादी यांना कळविली. ही माहिती मिळाल्यावर फिर्यादी हे पुण्याहून तातडीने नगरला आले आणि त्यांनी घरात जावून पाहणी केली असता त्यांना घरातील कपाटात ठेवलेले सुमारे ९ लाख १७ हजार रुपये किंमतीचे विविध प्रकारचे सोन्या चांदीचे दागिने व २२ हजारांची रोकड असा ९ लाख ३९ हजारांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

याबाबत त्यांनी कोतवाली पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळताच शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक दिलीप टिपरसे, कोतवाली पोलिस ठाण्याचे पो.नि. संभाजी गायकवाड, स.पो.नि. कुणाल सपकाळे यांच्या सह पोलिस पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली. या प्रकरणी पांडुरंग धोत्रे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक शीतल मुगडे या करत आहेत.

## हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाच्या विविध कर्ज योजनांच्या लाभासाठी अर्ज करावेत

नगर - हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्यादित (महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाची उपसंस्था) यांच्यामार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात विविध कर्ज योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या अंतर्गत विशेष घटक योजना आणि बीजभांडवल योजना प्रत्येकी ११ कर्जप्रकरणांसाठी, थेट कर्ज योजना चार प्रकरणांसाठी तर एनएसएफडीसी योजना १४ कर्जप्रकरणांसाठी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

इच्छुक अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज https://mpbcdc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून सादर करावेत, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्ड, मतदानकार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट आकाराचा फोटो, व्यवसायाचे कोटेशन, वीज बिल, कर पावती, भाडेकरारपत्र किंवा उतारा, व्यवसायाचा न हरकत दाखला, शाळेचा दाखला आदी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

योजनेबाबत अधिक माहितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर-मनमाड रस्ता, अहिल्यानगर येथील महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# देणगीदार महिलेच्या 'मृत्यूपत्रा'मधील इच्छेविरुद्ध जाऊन जैन धार्मिक कार्याच्या जागेवर संग्राम जगतापांचे कार्यालय

## किरण काळे यांचा आरोप; विक्री प्रक्रियेला स्थगिती देत सखोल चौकशी करा : शिवसेना उद्धव ठाकरे गटाची जॉईंट चॅरिटी कमिशनरकडे मागणी

नगर - अहिल्यानगर येथील स्टेशन रोडवरील हुंडेकरी चाळ या नावाने ओळखली जाणारी ही मिळकत आहे. सि.स.नं. फायनल प्लॉट नंबर ११९ असून सुमारे ५००० स्क्वे. फु. हा भूखंड आहे. श्रीमती मंगुबाई हिरालाल व्होरा यांनी वयाच्या ७० व्या वर्षी २१ जानेवारी १९७५ ला आपले मृत्युपत्र केले होते. बक्षीस म्हणून ही जागा त्यांनी जैन मंदिर ट्रस्टला दान केली होती. १८/०६/१९८७ रोजी गाव नमुना नंबर ६ ड चा फे. नंबर २६२० अन्वये जैन मंदिर ट्रस्टचे नाव उताऱ्यावर लागले आहे. या भूखंडाच्या सातबारावर आजही ट्रस्टचेच नाव आहे. देणगीदाराने अटी, शर्ती घातल्या होत्या. त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, कधीही कोणास विकू नये. अगर दुसऱ्या कोणासही कोणत्याही प्रकारे देऊ नये. तिचा उपयोग फक्त धार्मिक कृत्याकरिताच करावा. त्यामुळे या व्यवहारात सहभागी असणाऱ्या ट्रस्टीना देखील जागा विक्रीची प्रक्रिया राबवण्याचा, प्रत्यक्ष विक्री करण्याचा, राजकीय कार्यासाठी भाड्याने देण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही, असा आरोप शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे गटाचे शहर प्रमुख किरण काळे यांनी पुणे येथे पत्रकार परिषदेत केला. यावेळी मनोज गुंदेचा, विलास उबाळे आदी उपस्थित होते.



अहिल्यानगरमधील जैन समाजाच्या असणाऱ्या श्री ऋषभ संभव जिन जैन श्वेतांबर संघ (जैन मंदिर) ट्रस्टच्या जागेबाबत माहिती देताना शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे शहरप्रमुख किरण काळे. समवेत मनोज गुंदेचा विलास उबाळे.

अहिल्यानगरमधील जैन समाजाच्या असणाऱ्या श्री ऋषभ संभव जिन जैन श्वेतांबर संघ (जैन मंदिर) ट्रस्टच्या धर्म कार्यासाठीच्या जागेत अनेक गुन्हेगारांची ऊठबस होत असल्याचा देखील आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, ३ नोव्हेंबर रोजी सकाळी जॉइंट चॅरिटी कमिशनर, पुणे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करत या प्रकरणाच्या सखोल चौकशीची काळे यांनी मागणी केली आहे.

यावेळी काळेंनी मृत्यपत्र, सिटी सर्व्हे उतारा, जागेचा नकाशा, भूखंड विक्री जाहीर नोटीस, आ. जगताप यांच्या राजकीय कार्यालयचे फोटो, व्हिडिओ हे पुरावेच प्रसारमाध्यमांना दाखवले.

काळे म्हणाले, या जागेचा पूर्वी जैन आचार्य, ऋषी मुनी, साधू, साध्वींच्या विश्राम, प्रवचनासाठी उपयोग केला जायचा. मात्र या जागेच्या विक्रीबाबत वृत्तपत्रात अचानक जाहीर नोटीस काढून भूखंड विक्रीसाठी टेंडर प्रक्रिया राबविली गेली आहे.

### तक्रारीत केलेल्या मागण्या

१) बेकायदेशीर विक्री होण्यापूर्वी हा भूखंड वाचवा. विक्री प्रक्रियेस तात्काळ स्थगिती द्या.

२) ट्रस्टच्या ट्रस्टीज, अध्यक्ष यांना तात्काळ लेखी नोटीस बजावून खुलासा मागवा.

३) गैरव्यवहाराची सखोल चौकशी करा.

४) संबंधित दोषींवर योग्य ती नियमोचित कारवाई करा.

### देणगीदाराच्या इच्छेविरुद्ध जाऊन भविष्यात कधीही ट्रस्टने भूखंड विक्री करु नये

किरण काळे यांनी, भूखंडावर असणारा ताबा ८ दिवसांच्या आत खाली करण्याचे तात्काळ आदेश करण्याची मागणी जॉइंट चॅरिटी कमिशनर यांच्याकडे केली आहे. ताबा खाली केल्यानंतर त्याबाबतचे छायाचित्र व व्हिडिओग्राफीसह अहवाल कमिशनर यांनी मागवावा, असे त्यांनी म्हटले आहे. तसेच देणगीदाराच्या इच्छेविरुद्ध जाऊन भविष्यात कधीही ट्रस्टने भूखंड विक्री करु नये, असा आदेश करण्याची मागणी काळेंनी केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### फिश स्पाचे तोटे

सुंदर दिसण्यासाठी आणि विश्रांतीसाठी लोक फिश स्पा वापरतात. ही एक प्रकारची सौंदर्य उपचार आहे. पायाची त्वचा सुंदर आणि सुंदर बनवण्यासाठी ते फिश स्पाचा सहारा घेतात. त्यासाठी पाण्याने भरलेल्या टाकीत पाय ठेवून बसावे लागते. त्या टाकीत मासे असतात. हे मासे तुमच्या पायाची मृत त्वचा खातात. तसेच, ते तुमच्या त्वचेला मऊ आणि एक्सफोलिएट करण्याचे काम करते. पण असे म्हटले जाते की फिश स्पामुळे तुम्हाला अनेक गंभीर आजारांचा धोकाही असतो. हा स्पा करून तुम्ही त्वचेशी संबंधित अनेक गंभीर आजारांना बळी पडू शकता. फिश स्पा घेतल्याने त्वचेच्या संसर्गाचा धोकाही वाढतो. टाकीत असलेल्या माशांसोबत अनेक प्रकारचे जीवाणू देखील आढळतात. अशा परिस्थितीत, जेव्हा तुम्ही या जीवाणूंच्या संपर्कात येता तेव्हा तुमच्या त्वचेच्या संसर्गाचा धोकाही वाढतो. याच कारणामुळे अमेरिकेपासून कॅनडापर्यंत जगातील अनेक देशांमध्ये फिश स्पावर बंदी घालण्यात आली आहे. फिश स्पा तुमची त्वचा टोन देखील खराब करू शकते. कारण योग्य पेडीक्योर न केल्यामुळे तुमची त्वचा खडबडीत होते.

## पाककला

### घावण

**साहित्य** - तांदूळ पीठ-एक वाटी, पाणी- दीड वाटी, मीठ चवीनुसार, हिरवी मिरची, जिरे-अर्धा चमचा, तेल किंवा तूप

**कृती** - सर्वात आधी एका भांड्यात तांदूळ पीठ, मीठ, जिरे, मिरची घाला. आता हळूहळू पाणी घालून घट्ट सर मिश्रण फेटून घ्या. आता नॉन-स्टिक तवा गरम करा, त्याला थोडे तेल लावा. आता मोठ्या चमच्याने बॅटर तव्यावर पसरवा. व मध्यम आचेवर १-२ मिनिटे भाजा, वरून तेल किंवा तूप लावा. उलटून दुसऱ्या बाजूला खरपूस भाजून घ्या. तर चला तयार आहे आपला झटपट नाश्ता तांदळाचे घावन, खोबऱ्याची चटणी सोबत नक्कीच ट्राय करा.

## वास्तू

### हत्तीची मूर्ती कशी ठेवावी

* मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूला एक हत्तीची मूर्ती ठेवा. हे नकारात्मक ऊर्जा आत येण्यापासून रोखते.

* हत्तीचा चेहरा आतल्या दिशेने असल्याची खात्री करा. ड्रॉइंग रूमच्या उत्तर दिशेने हत्तीची मूर्ती ठेवणे शुभ मानले जाते.

* तुटलेली हत्तीची मूर्ती ठेवू नका; ती दुर्दैव आणू शकते.

हत्तीची मूर्ती थेट जमिनीवर ठेवू नका; ती नेहमी स्टूल किंवा स्टँडवर ठेवा.

## सौंदर्य

जर तुमच्या डोळ्यांखाली काळी वर्तुळे असतील तर तांदळाचे पीठ, टोमॅटोचा रस आणि कच्च्या दुधात हळद मिसळून पॅक तयार करा. १५ मिनिटे चेहऱ्यावर लावा आणि नंतर चेहरा धुवा. काही दिवसांनी तुम्हाला त्याचा परिणाम दिसेल.

## सल्ला

स्मार्टफोनचे आयुष्य वाढविण्यासाठी चार्जिंग पोर्ट, स्पीकरमध्ये धूळ जाऊ देऊ नका व ओव्हरहीटिंग होऊ देऊ नका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५

**त्रिपुरारि पौर्णिमा, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, अश्विनी ०९।४०, सूर्योदय ०६ वा. ३५ मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. घरांत उत्साहाचे वातावरण होईल.

**वृषभ** : जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल. मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन** : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**कर्क** : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**सिंह** : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही.

**कन्या** : आर्थिक बाबतीत एखादी विषम परिस्थती उद्भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहावी लागेल.

**तूळ** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**वृश्चिक** : सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा. यथायोग्य विचार करून कार्य करा.

**धनु** : रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल. शत्रूंपासून सावध राहा.

**मकर** : घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.

**कुंभ** : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**मीन** : आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२९६ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ | १ | २ | ■ | ३ | ४ | | ५ |
| ६ | | | ७ | | | ■ | |
| ८ | | ■ | ९ | | ■ | १० | |
| ११ | | १२ | ■ | ■ | १३ | | |
| | ■ | १४ | १५ | | | ■ | ■ |
| ■ | १६ | | | ■ | १७ | १८ | १९ |
| २० | | ■ | २१ | | ■ | २२ | |
| २३ | | | | ■ | २४ | | |

**आडवे शब्द :-** १) भीम आणि दुर्योधनाचे शस्त्र ३) पावशेराचा अर्धा भाग ६) अराजक; गोंधळाची स्थिती; बेबंदशाही ८) अरबी देव ९) वृष्टी; वर्षाव १०) हत्या; खून ११) काव्याचा विशेषत: उर्दू काव्याचा एक प्रकार १३) पांढऱ्या रंगाचे एक सुगंधी फूल १४) घाई; त्वरा; धांदल १६) खोटी रचलेली गोष्ट; कुभांड १७) उसण; चमक २०) ताडकन फुटणारी एक वस्तू २१) भक्त किंवा सेवक यांचा समूह २२) सोळा पायल्या धान्याचे माप २३) जिचा पती वारला आहे अशी स्त्री; विधवा २४) ओढा वगैरेवर बांधलेला तात्पुरता पूल

**उभे शब्द :-** १) गडबड; गलबला; गोंधळ २) दबाव; प्रेशर; दडपण ३) पूर्ण नसलेला; अपूर्ण ४) डोंगर वगैरेतील खोलगट भाग ५) धरणी; रसा; पृथ्वी ६) फासळी ७) गोळा झालेले; आय १०) लोकनाट्य तमाशातील एक भाग; ओळख १२) स्त्री; विलासिनी स्त्री १३) बाबराचे घराणे १५) बोभाट; गडबड १६) कमाईतील काही भाग बाजूला काढून जमा करणे; सेव्हिंग १८) लकाकी; उसण; तेज; लचक १९) दया; करुणा २०) एक पक्षी; कावळा; काक; वायस

### शब्दगंध क्र. ७२९५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | शो | क | च | व्हा | ण | ■ | मं |
| मा | ■ | र | म | ■ | ■ | मा | न |
| प | ■ | स | त्का | र | ■ | ग | ळ |
| ■ | ■ | न | र | मा | ई | ■ | वा |
| अ | व | धा | ■ | प | र | क | र |
| व | र्षा | व | ■ | ती | ■ | इ | ■ |
| ता | ■ | री | स | ■ | खं | ■ | मा |
| र | क्षा | ■ | य | व | त | मा | ळ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : शांतता ही आत्म्याची भाषा आहे.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## लिपस्टिकमुळे खरोखर कर्करोग होऊ शकतो का?

लिपस्टिक ही महिलांसाठी सौंदर्याची ओळख आहे, पण याबाबत एक सामान्य शंका आहे की त्यामुळे कर्करोग होऊ शकतो का? ही शंका मुख्यतः लिपस्टिकमधील काही रसायने आणि धातू (जसे लीड, क्रोमियम, कॅडमियम) यांमुळे निर्माण होते. विश्वसनीय स्रोतांवरून (जसे FD, merican Cancer Society, आणि विविध अभ्यास) याहून गोळा केलेल्या माहितीनुसार थोडक्यात सांगायचे तर, लिपस्टिकमुळे थेट कर्करोग होत नाही, पण दीर्घकाळ वापर आणि जास्त प्रमाणात सेवन केल्यास काही रसायने कर्करोगाचा धोका वाढवू शकतात.

लिपस्टिकमधील काही घटक कर्ककारक (carcinogenic) असू शकतात, ज्यामुळे दीर्घकालीन धोका असतो. जसे की, लीड (Lead): FD च्या २०११ अभ्यासानुसार, ४०० लिपस्टिक पैकी ४०० मध्ये लीड आढळले, पण प्रमाण कमी आहे. लीड हे संशयित कर्ककारक आहे (suspected carcinogen), जे त्वचा कर्करोग किंवा इतर समस्या निर्माण करू शकते. पण सामान्य वापरात ते आरोग्यासाठी धोकादायक नाही, कारण प्रौढ व्यक्ती ८% लीडच शोषून घेते.

यूनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्केलीच्या अभ्यासात (२०१३) ३२ लिपस्टिकमध्ये क्रोमियम आढळले, जे पोटात ट्यूमरशी जोडलेले आहे. जास्त वापर करणाऱ्यांसाठी धोका जास्त. हे फुफ्फुस कर्करोग किंवा किडनी समस्या वाढवू शकतात. पॅराबेन्स हे हार्मोन डिसरप्टर्स आहेत, जे ब्रेस्ट कर्करोगाशी जोडले जातात. ते लिपस्टिकचे प्रिझर्व्हेटिव्ह म्हणून वापरले जातात आणि दीर्घकाळ वापराने हार्मोन्स बिघडवतात. फॉर्मेल्डिहाइड आणि रेटिनिल पाल्मिटेट हे डीएनए नुकसान करू शकतात आणि UV किरणांमुळे कर्करोग वाढवू शकतात. एका महिलेला दिवसात २-३ वेळा लिपस्टिक लावली तर ती २४ तासांत २४ मिलिग्रॅम लिपस्टिक गिळते. हे कमी प्रमाणात असले तरी, वर्षानुवर्षे चालू राहिले तर धोका वाढतो. विशेषतः गर्भवती महिलांसाठी फुफ्फुस आणि मेंदूच्या विकासासाठी धोकादायक.

तज्ज्ञांच्या मतात एकमत नाही, पण बहुसंख्य म्हणतात की धोका कमी आहे, तरी सावधगिरी बाळगा

अमेरिकन कॅन्सर सोसायटी कॉस्मेटिक्समधील घटकांची दीर्घकालीन चाचणी कठीण आहे, पण प्राण्यांवर चाचण्या दाखवतात की काही रसायने कर्करोग निर्माण करू शकतात. तरीही, सामान्य वापरात ते सुरक्षित आहेत, कारण प्रत्येक उत्पादनाची चाचणी करणे शक्य नाही. शेवटी, लिपस्टिकचा आनंद घ्या, पण स्मार्टपणे! जर तुम्हाला एलर्जी किंवा इतर समस्या असतील, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## वाघ आणि वाटसरू

एक म्हातारा वाघ जंगलात राहत होता. म्हातारपणामुळे त्याचे शरीर कमकुवत झाले होते. त्याचे दात आणि नखे कमकुवत झाले होते. त्याच्याकडे पूर्वी असलेली ताकद आणि चपळता नव्हती. त्याच्यासाठी शिकार करणे कठीण झाले. तो दिवसभर भटकत असे, फक्त एक लहान प्राणी शोधण्यासाठी. त्याचे दिवस असेच जात होते.

एके दिवशी, तो भक्ष्याच्या शोधात भटकत होता. संपूर्ण दिवस उलटूनही त्याला कोणताही शिकार सापडला नाही. तो एका नदीजवळ पोहोचला, पाणी प्यायला आणि विश्रांती घेण्यासाठी बसला.

तो तिथे बसला असताना, त्याची नजर एका चमकणाऱ्या वस्तूवर पडली. त्याने जवळून पाहिले आणि पाहिले की ते सोन्याचे कंगन होते. सोन्याचे कंगन पाहून त्याला त्याच्या शिकारला पकडण्याची योजना सुचली.

तो येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकाला सोन्याचे कंगन दाखवत असे आणि त्यांना इशारा करत असे, मला हे सोन्याचे कंगन सापडले आहे. मी त्याचे काय करू? माझ्याकडे जगण्यासाठी फक्त काही दिवस उरले आहे. मला वाटते की मी ते दान करावे आणि काही पुण्य मिळवावे. जेणेकरून मृत्यूनंतर मला स्वर्ग मिळेल. माझ्याकडे या आणि हे कंगन घ्या. वाघासारख्या धोकादायक प्राण्यावर कोण विश्वास ठेवेल? कोणीही त्याच्या जवळ आले नाही आणि दूरवरून पळून गेले. खूप उशीर झाला होता आणि सोन्याच्या कंगनच्या मोहात कोणीही त्याच्या जवळ गेले नाही. वाघाला वाटू लागले की त्याची योजना काम करत नाही. तेवढ्यात त्याला नदीच्या पलीकडे एक वाटसरू दिसला.

वाघ सोन्याचे कंगन हलवत मोठ्याने ओरडला, महाराज! मी हे सोन्याचे कंगन दान करत आहे. ते घेऊन तुम्ही मला पुण्य मिळवण्यास मदत कराल का?

वाघाच्या बोलण्यावर वाटसरू थांबला. सोन्याच्या कंगनच्या चमकाने त्याचे हृदय लोभाने भरले. पण त्याला वाघाची भीतीही वाटत होती. तो म्हणाला, तू एक धोकादायक प्राणी आहे. मी तुझ्यावर कसा विश्वास ठेवू? जर तू मला मारून खाशील तर?

वाघाने उत्तर दिले, मी माझ्या तरुणपणी खूप शिकार केली. पण आता मी म्हातारा झालो आहे. मी शिकार करणे सोडून दिले आहे. मी पूर्णपणे शाकाहारी झालो आहे. आता मला फक्त पुण्य मिळवायचे आहे. माझ्याकडे ये आणि हे कंगन घे. प्रवासी विचारात हरवला होता. पण लोभाने त्याचे मन भ्रष्ट केले होते. त्याने वाघापर्यंत पोहोचण्यासाठी नदीत उडी मारली. तो दुसऱ्या काठावर पोहणार होता तेव्हा त्याला त्याचा पाय चिखलात अडकलेला आढळला. तिथे एक दलदल होती.

दलदलीतून बाहेर पडण्यासाठी तो जितका जास्त संघर्ष करत होता तितकाच तो बुडाला. स्वतःला वाचवण्यासाठी त्याने वाघाला हाक मारली. वाघ या संधीची वाट पाहत होता. त्याने प्रवाशाला आपल्या पंजेत धरले, दलदलीतून बाहेर काढले आणि तो विचार करण्याआधीच त्याला ठार केले. अशा प्रकारे, सोन्याच्या कंगनसाठी वाटसरूने आपला जीव गमावला.

तात्पर्य : लोभ ही वाईट गोष्ट आहे.

# जीवन का अमृत (भाग १)



## अमरत्व का विज्ञान

कुछ लोग मनोरंजन के विभिन्न साधनों में इसे ढूँढ़ते हैं : वे सिनेमा देखने जाते हैं, संगीत सुनते हैं. सांस्कृतिक प्रोग्राम देखते हैं.टी.वी देखते हैं या फिर इंद्रियों के भोगों में लगे रहते है। कुछ अन्य लोग खेल-कूद में भाग लेकर या खेल-कूद के प्रोग्राम देखकर सुख पाना चाहते हैं। फिर कुछ ऐसे भी हैं, जो शराब और नशेदार वस्तुओं के सेवन से सुख पाना चाहते हैं।

अगर हम इन सभी गतिविधियों का बारीकी से विश्लेषण करें, तो पाएँगे कि इनसे हमें स्थायी सुख-शांति नहीं मिलती। उनसे कुछ समय के लिए तो खुशी मिल सकती है, पर जब हमारी कोई भी संपत्ति या चीज़ हमसे छिन जाती है या हमारा संबंध किसी से टूट जाता है तो हमें बहुत दुःख या परेशानी होती है। अगर हमारी कार दुर्घटनाग्रस्त हो जाए, तो हम अपने भाग्य को कोसने लगते हैं। अगर हमारा घर आग में जल जाए, तो हम ऐसा महसूस करते हैं, जैसे हमारा सब कुछ नष्ट हो गया हो। अ अचानक हमारा दिवालिया निकल जाए, तो हम इतने निराश हो जाते हैं कि हम आत्महत्या तक की सोचने लगते हैं। अगर हम बीमार हो जाएँ और वह कुछ न कर पाएँ, जो आमतौर से करते हैं, तो फिर हम असंतुष्ट और कुंठित हो उठते हैं। अगर हमारी . नौकरी छूट जाए, तो हम उदासी से भर जाते हैं। अगर हमारा कोई प्रिय मित्र-संबंधी हमसे बिछुड़ जाए, तो हम गहरे शोक में डूब जाते हैं। जो खुशी हमें अपनी धन-संपत्ति, अपने मित्र-संबंधियों या अपनी नौकरी-पेशे से मिलती थी, वह उनके न होने से दुःख-संताप में बदल जाती है। जिंदगी के किसी मोड़ पर, हमें अहसास होने लगता है कि इस बाहरी संसार की हर खुशी क्षणभंगुर है। (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

## मन एक रेडीयो स्टेशन है

कानून व्यवस्था को सुधारने के लिए राज्य के पुलिस डायरेक्टर और गृहमंत्री को बाबा को सामने रखते हुए तरंगे दो। आपके विचार उन्हें प्रेरित करेंगे और कानून का पालन करेंगे। दुनिया में कोई भी सुधार आप चाहते हैं, उस काम के लिए कौन जिम्मेवार है उन्हें तरंगे देते रहो। आपके मनचाहे कार्य होने लगेंगे। हिमालय में बैठे योगी आज भी अपने योग बल से विश्व को प्रेरित कर रहे हैं। ऐसे ही आप भी विश्व में किसी न किसी को प्रेरित करते रहो जी । आप जितने लोगों को प्रेरित करते हैं उतने क्षेत्र के राजा बनेंगे। यह संसार पुरुष और महिला से बना है। बाबा को देखते हुए कहें विश्व की सभी बहनें आप शांत स्वरूप हैं प्रेम स्वरूप हैं। आपका यह संकल्प विश्व के सभी बहनों को पहुँचेगा। बाबा को याद करते हुए कहें विश्व के सभी भाई आप शांत स्वरूप हैं, प्रेम स्वरूप हैं और विश्व के भाईयों की लंबी लाइन अपने सामने देखें। आपका यह संकल्प विश्व कि प्रत्येक आत्मा को पहुँच रहा है। उपरोक्त दो विधियां सर्वश्रेष्ठ हैं। इससे आपका प्रत्येक संकल्प विश्व की प्रत्येक आत्मा को दिमाग की समय विरोधी तरंगों के कारण से मिलता रहेगा। इन तरंगों पर खोज की जरूरत है परन्तु यह सचमुच में पहुँचती है। आप को संशय में नहीं आना चाहिये कि ऐसे कैसे होता है। इस विधि से आप मनसा सेवा करो देखना एक दिन में ही बहुत अच्छा लगेगा। आपके ये संकल्प बहुत गहरे तल पर काम करते हैं। उन लोगों को शब्द तो समझ नहीं आएंगे परन्तु उन्हें अच्छा लगेगा, खुशी होगी, कल्याणकारी विचार उठने लगेंगे। मानव स्वभाव की सबसे बड़ी जरूरत यह है कि वह महत्वपूर्ण अनुभव करना चाहता है। महत्वपूर्ण बनने की भावना भूख से भी ज्यादा ऊँची होती है। यह प्रेम से भी ऊँची होती है। यह सबसे प्रबल मानवीय इच्छा है। इसी लिए हम दरवाजे की नम्बरप्लेट पर उपाधियां लिखवाते हैं। किसी से संबंध तोड़ने का मुख्य कारण प्रशंसा का अभाव है। महत्व पाने और सराहे जाने की इच्छा सबसे शक्तिशाली होती है। लोगों की दिलचस्पी सिर्फ और सिर्फ खुद में होती है। इसमें मेरे लिए क्या है। हमारा हर काम आत्म-रुचि या स्वार्थ द्वारा प्रेरित होता है। (क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# हसा आणि शतायुषी व्हा!

कामगार: बॉस उद्या पासून मी रोज ठीक ६ वाजता घरी जाणार

बॉस: का? कामगार : सध्या मला पगार पुरत नाही म्हणून मी रात्री रिक्षा चालवणार

बॉस : ठीक आहे जा पण जर तुला रात्री भूक लागली तर अण्णा नगर मध्ये ये

कामगार : का सर? बॉस : मी तिथे इडली डोसा विकतो

# करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* वने व वन्यजीवन यामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारे पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आलेली व्यक्ती कोण? - मारुती चितमपल्ली

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

## बालकांचे आजार

आजच्या काळात अनेक कुटुंबांमध्ये आई नोकरी अथवा व्यवसाय करीत आहे. दोन्हीकडच्या जबाबदाऱ्या सांभाळताना तिची तारेवरची कसरत हाते असते. अशा वेळी घरातील इतर सदस्यांनीही मुलांवर संस्कार करण्यास वेळ द्यायला हवा. आईबरोबर वडिलांनीसुद्धा ही जबाबदारी आनंदाने स्वीकारायला हवी. एक ठरावीक वेळ द्यायला हवा. आईबरोबर वडिलांनीसुद्धा ही जबाबदारी आनंदाने स्वीकारायला हवी. एक ठरावीक वेळ वडिलांनी सुद्धा मुलांना द्यायला हवा. दिवसभरातून एक तास तरी मुलांजवळ बसायला हवे. त्यांना गोष्ट सांगणे, बागेत फिरायला घेऊन जाणे, सुट्टीच्या दिवशी सहलीला जाणे, तसेच एखाद्या दिवशी अनाथ आश्रमामध्ये जाऊन तेथील मुलांशी संवाद साधणे. थोडा वेळ मुलांचा अभ्यास घेणे, त्यांच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करणे, त्यांच्याशी मायेनं-आपुलकीने वागणे या सर्व जबाबदाऱ्यांमध्ये वडिलांचाही सहभाग हवा. आपल्या बाळासाठी आपण नाही वेळ देणार तर कोण देणार? लहान मुलांसोबत आपण वेळ घालविला तर आपलेही दुःख, नैराश्य भावना कमी होते, मन प्रफुल्लित राहते. श्लोकच्या आईला, 'पुढच्या वेळी येताना श्लोकच्या बाबांनाही घेऊन ये' असे सांगितले. पुढच्या तपासणीला त्याचे बाबासुद्धा आले होते. दोघांनाही श्लोकशी सकारात्मक बोलायला सांगितले. तू असा वागू नको, आम्हाला त्रास देऊ नको असे नकारात्मक बोलणे टाळून, श्लोक खूप शहाणा मुलगा आहे. त्याची वस्तू तो जागेवर ठेवतो. त्याच्यासमोर तुम्हीपण प्रत्येक वस्तू जागेवर ठेवायला शिका.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००




सावली संस्थेतील विद्यार्थ्यांना प्रयास ग्रुप व नम्रता दादी–नानी ग्रुपच्या वतीने शैक्षणिक साहित्य आणि अल्पोपहारासह फळ व चॉकलेटचे वाटप करण्यात आले.

# प्रयास व दादी–नानी ग्रुपच्या महिलांनी सावलीतील मुलांना दिली जिव्हाळ्याची भेट

नगर – केडगाव येथील सावली संस्थेतील निराधार व गरजू घटकातील विद्यार्थ्यांना प्रयास ग्रुप व नम्रता दादी–नानी ग्रुपच्या वतीने शैक्षणिक साहित्य आणि अल्पोपहारासह फळ व चॉकलेटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी दादी–नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, उज्वला बोगावत, मीरा पाटील, प्रयास ग्रुपच्या संस्थापिका अलकाताई मुंदडा, सावलीचे संस्थापक नितेश बनसोडे, बुरुडगाव जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका आरती थोरात, लला डेंगळे, लीला अग्रवाल, पुनम अग्रवाल, सविता धामट, ज्योत्स्ना कुलकर्णी, ज्योती जोशी, राखी जाधव, रेखा मैड, जयश्री पुरोहित, मेघना मुनोत, लता आंबेकर, शुभांगी भोयर, विमल साठे, रोहिणी पवार, विद्या कुलकर्णी, सुजाता कदम, नीलिमा पवार, सुरेखा जंगम, रेखा फिरोदिया आदी उपस्थित होत्या.

नितेश बनसोडे म्हणाले की, गरजू घटकांना मदत अनेकजण करतात, पण त्या मुलांना जिव्हाळ्याने जवळ घेणे, प्रेम देणे महत्त्वाचे असते. हेच त्यांच्यासाठी खरे समाधान ठरते. प्रयास आणि नम्रता दादी–नानी ग्रुपच्या महिलांनी आज या मुलांना मातृत्वाचा जिव्हाळा दिला, हे कौतुकास्पद आहे. प्रयासच्या माध्यमातून मागील तीन दशकांपासून महिला सक्षमीकरण आणि सामाजिक कार्य सुरू आहे. ही महिलांची चळवळ आता समाजासाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

मीरा पाटील म्हणाल्या की, निराधार मुलांना आपण दुरावलेले समजतो, पण ते आपल्या समाजाचाच अविभाज्य भाग आहेत. त्यांना प्रेम, आधार आणि प्रोत्साहनाची गरज आहे. प्रत्येकाने या मुलांकडे आपलेपणाने पाहिले, तर त्यांचे आयुष्य उजळून निघेल. यासाठी महिलांनी पुढाकार घेऊन घेतलेल्या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

जयाताई गायकवाड म्हणाल्या की, ग्रुपच्या सर्व महिला फक्त मनोरंजनापुरते एकत्र येत नसून, सामाजिक जबाबदारीतून आपले योगदान देत आहे. सावली संस्थेतील या लहानग्यांना प्रेमाने जवळ करताना मातृत्वाचा खरा अर्थ उमगल्याचे ते म्हणाल्या.

# 'जनजाती गौरव वर्षानिमित्त' १५ नोव्हेंबरपर्यंत संपूर्ण राज्यभरात विविध उपक्रम राबविणार

नगर – पेयजल व स्वच्छता विभाग तसेच जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त १५ नोव्हेंबर २०२४ ते १५ नोव्हेंबर २०२५ हा कालावधी जनजाती गौरव वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने राज्य शासनाच्या मार्गदर्शनानुसार १ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत संपूर्ण राज्यात जनजाती गौरव वर्ष (पंधरवडा) मोहीम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली.

या मोहिमेचा उद्देश आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक योगदानाचा गौरव करणे तसेच ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये जल जीवन मिशनअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजना, पाणी गुणवत्तेची तपासणी, पाणी व्यवस्थापन आणि शाश्वततेबाबत जनजागृती निर्माण करणे हा आहे.

### अभियान कालावधी व प्रमुख उपक्रम

या मोहिमेअंतर्गत पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत –

१ नोव्हेंबर – मोहीम उद्‌घाटन व जनजागृती कार्यक्रम जनजाती गौरव वर्ष (पंधरवडा) मोहिमेचा शुभारंभ जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर करण्यात येईल. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उद्घाटन व मार्गदर्शनाचे कार्यक्रम आयोजित केले जातील.

४ नोव्हेंबर – जल जीवन मिशन व हर घर जल योजना माहिती सत्र ग्रामपातळीवर जल जीवन मिशन व हर घर जल योजनेची माहिती देणारे सत्र, योजनांचे आराखडे, जनजागृती फलक व माहितीपत्रके सादर करण्यात येतील.

६ नोव्हेंबर – पाणी गुणवत्तेची तपासणी व स्त्रोत स्वच्छता शाळा व ग्रामस्तरावर FTK (Field Test Kit) द्वारे पाण्याची गुणवत्ता तपासून अहवाल तयार केला जाईल. जलस्त्रोत स्वच्छतेचे उपक्रमही पार पडतील.

१० नोव्हेंबर – पाणीपट्टी वसुली, देखभाल व दुरुस्ती मोहीम ग्रामपातळीवरील जलस्त्रोतांची स्वच्छता, गळती दुरुस्ती व वसुली मोहिमेबाबत जनजागृती केली जाईल.

१२ नोव्हेंबर – पाणी वापर व शाश्वत व्यवस्थापन प्रभातफेरी शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी प्रभातफेरी काढून जलसंवर्धन, शाश्वत पाणी वापर आणि व्यवस्थापनाचा संदेश देतील.

१५ नोव्हेंबर – समारोप व अनुभव सादरीकरण मोहिमेदरम्यान राबविलेल्या सर्व उपक्रमांचा अहवाल, छायाचित्रे व यशोगाथा सादर केल्या जातील.

या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी ग्रामपंचायत, शाळा, स्थानिक संस्था व स्वयंसेवी संस्थांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात येणार आहे. जनजाती समाजातील प्रतिनिधींना सन्मानपूर्वक आमंत्रित करून त्यांच्या सहभागातून कार्यक्रम पार पाडले जाणार आहेत.

सर्व उपक्रमांचे छायाचित्र, व्हिडिओ व संक्षिप्त अहवाल पंचायत समितीमार्फत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे सादर करण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत. तसेच उपक्रमांचा सविस्तर अहवाल जनजाती गौरव वर्ष पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे.

जिल्ह्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी या उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवून अभियान यशस्वी करावे, असे आवाहन जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक राजेंद्र देसले यांनी केले.

# अविस्मरणीय, सफल व ऐतिहासिक चातुर्मास : हस्तीमल मुनोत

नगर – आनंदधाम या पवित्र स्थळी चातुर्मासिक प्रवचन तप जप साधना आराधना व विविध धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी श्रावक संघाच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी संतांचे चातुर्मासाचे आयोजन करण्यात येते व येथे होणारे चातुर्मास ऐतिहासिक होतात. आनंदधाम येथे वात्सल्यमूर्ती श्री दर्शनप्रभाजी, सर्वप्रिय डॉ. श्री अनुपमाजी म सा, ज्ञान आराधिका, मधूर वक्ता श्री जिनेश्वराजी म सा आदि ठाणे ८ यांचा चातुर्मास समापन झाला. या निमित्ताने उपस्थित श्रावक श्राविकांनी चातुर्मासात पूज्य महाराज साहेबांनी दिलेल्या अमूल्य ज्ञानामुळे आपले जीवन सार्थक झाल्याचे शाब्दिक तर काहींनी गीत गाऊन तर काहींनी श्री जिनेश्वराजी यांच्या सारखी हुबेहुब नक्कल करून उत्साहपूर्ण आपले मनोगत व्यक्त केले.

साधू–साध्वीजींच्या सानिध्यात व त्यांच्या प्रेरणेतून आपल्या दिनचर्येत अनेक बदल होतात व यातून जागृत होऊन जीवनात येणाऱ्या अनेक समस्यांवर मात करण्याचे योग्य समाधान मिळते. वर्ष २०१७ चा व या वर्षी २०२५ चा पण हे दोन्ही चातुर्मास खुप प्रेरणादायी व उत्साहात झाले. जिनेश्वराजीनी आत्मसात केलेले अमूल्य ज्ञान व प्रेरणा देऊन विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करून भाविक भक्तांची मने जिंकली.



आनंदधाम येथे वात्सल्यमूर्ती श्री दर्शनप्रभाजी, सर्वप्रिय डॉ. श्री अनुपमाजी म सा, ज्ञान आराधिका, मधूर वक्ता श्री जिनेश्वराजी म सा आदि ठाणे ८ यांचा चातुर्मास समापन झाला.

आजच्या युवकात आध्यात्मिक गोडी निर्माण व्हावी म्हणून श्रावक संघाच्या माध्यमातून चातुर्मास तसेच वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. चातुर्मास कालावधीत अनेक कार्य व खर्च असतात आणि याकरिता समाज बांधव सढळ हाताने आर्थिक मदत व सेवाही देतात. या चातुर्मास काळात साधू–साध्वींची सेवा, ऐच्छिक देणगी व भोजनमिती सहकार्य करणाऱ्या सर्वांचे विशेष कौतुक आभार अभिनंदन धन्यवाद व्यक्त करून या चातुर्मासात प्रति दिवस प्रवचन व साध्वीजींच्या प्रेरणेतून ब्यासना, एकासन, आयंबील, एक उपवास, बेला, १५० तेला, १२४ अठाई, नऊ उपवास, अकरा उपवास, पाच मासखमण अश्या अनेक तपस्या झाल्या. चातुर्मास प्रारंभ झाल्यावर चातुर्मासात पूज्यपाद श्री तिलोकऋषिजी म सा पुण्यतिथी, राष्ट्रसंत आचार्य सम्राट पूज्य श्री आनंदऋषिजी महाराज साहेब यांची १२६ वी जन्म जयंति, रक्षाबंधन, विश्वमैत्री दिन, आचार्य श्री अमोलोकऋषिजी म सा जन्मजयंति, पर्युषण पर्व, संवत्सरी महापर्व, कल्पसूत्र वांचना, सामूहिक क्षमापना, आचार्य श्री आत्मारामजी म सा जन्मजयंती, ध्यानयोगी आचार्य श्री शिवमुनिजी म सा जन्म जयंती, युवाचार्य श्री महेंद्रऋषिजी म सा जन्म जयंती, प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी जन्म दिवस, आयंबील ओळी तप, उत्तराध्यायन सूत्र वांचना व विविध धार्मिक कार्यक्रमाचे सुंदर आयोजन संपन्न झाले. संवत्सरी नंतर ही आनंद समवशरण मध्ये श्रावक श्राविकांची उपस्थिती होती.

चातुर्मासाच्या सुरवातीपासून साध्वीजींकडील ज्ञान खजिन्यातील अनेक सुंदर सुंदर धार्मिक कार्यक्रमांचे लाभ आपल्या सर्वांना मिळाले. सर्व साध्वींनी धर्म प्रेमी श्रद्धाशील गुरूभक्तांना जीवन सार्थक कसे करावे याबाबत आपले अनमोल मार्गदर्शन देऊन कृतार्थ केले, असे मनोगत अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन मनीषा मुनोत यांनी केले.

चातुर्मास कालावधीतच नव्हे तर संपूर्ण वर्षभर संत सतीयांची, श्रावक श्राविकांची अहिल्यानगर श्रावक संघ विशेष काळजीपूर्वक कार्य करत असतात. याबद्दल साधूवाद व्यक्त करून श्री अनुपमाजी म सा यांनी श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत व त्यांच्या सर्व सहकारी सदस्यांमुळे व येथील श्रावक श्राविकांमुळे अहिल्यानगर आनंदधाम येथील गुरुदेव आचार्य भगवंतांच्या पावनस्थळी दोन वेळा असा अविस्मरणीय चातुर्मास करण्याचा आम्हा सर्व साध्वींना लाभ मिळाला, असे गौरवोद्गार व्यक्त केले.

श्री अनुपमाजी म सा आदी ठाणा यांचा आगामी वर्ष २०२६ चा चातुर्मास वर्धमान प्रतिष्ठान पुणे येथे होईल, अशी माहिती अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांनी दिली.

चातुर्मास कालावधीत श्रावक संघातील सदस्यांकडून पूज्यवरांच्या सेवेत तथा श्रावक श्राविकांच्या सुविधेत काही चुका झाल्या असतील तर मन, वचन, काय ने क्षमा मागुन सर्व संतांचे व साध्वींचे स्वास्थ्य चांगले राहो व आपल्या हातून जिनशासनाची अशीच प्रभावना वाढत राहो, असे सांगून नितीन कटारिया यांनी उपस्थित सर्वांचे आभार धन्यवाद व्यक्त केले. तसेच चातुर्मास कालावधीत ऐच्छिक दानराशी, भोजनमिती सहयोग सहकार्य करणारे आणी ज्ञात अज्ञात सेवा सहकार्य करणारे सर्वाचे आभार धन्यवाद व्यक्त करून आनंदराम मुनोत, संतोष बोथरा, बाबुशेठ लोढा, रतिलाल कटारिया, संतोष गांधी, अभय लुणिया, राजेश बोरा, मदन मुनोत, किशोर मुनोत, अजीत बोरा तसेच श्रावक संघातील सर्व सदस्यांनी चातुर्मास सफल होण्याकरिता परिश्रम घेतले.

चातुर्मास समापन निमित्ताने उपस्थित करिता गौतमप्रसादी ठेवण्यात आली. यानंतर पूज्यवरांच्या पाच मंगलपाठाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



सौ. लतिका सुनिल भळगट यांची मासखमन तप पूर्णाहुती सोहळा धार्मिक मंगलमय वातावरणात पार पडला.

# सौ. लतिका भळगट यांची मासखमन तप पूर्णाहुती

नगर – आगरकरमळा येथे ज्ञानगंगोत्री प्रभाकुवरजी म. सा यांच्या सुशिष्या जिनशासनप्रभाविका जिनशासनगौरव अनुप्रेक्षाजी म.सा, श्रुतिप्रभाजी म.सा., ऋजूप्रभाजी म. सा यांचा चातुर्मास सुरू आहे. यामध्ये सुरवातीपासून जप, तप, प्रवचन सुरू आहे. सिद्धि तप, गणधर तप, पद्मावती तप, ८,९, ११, १५, २१, मासखमन असे अनेक तप झाले. सौ. लतिका सुनिल भळगट यांची मासखमन तप पूर्णाहुती सोहळा धार्मिक मंगलमय वातावरणात पार पडला. वरघोडा उत्साहात झाला. यासाठी विविध ठिकाणांहून भक्तगण उपस्थित होते. म. साब यांचे प्रवचन आणि नंतर पचकावणी तसेच तपस्वीचा सन्मान सोहळा आगरकर मळा संघ, कोठारी परिवार, मेहेर परिवार, फिरोदिया परिवार कडून पार पडला. यावेळी आगरकरमळा संघाचे अध्यक्ष अभय कोठारी यांनी स्वागत केले. सौ. दर्शना फिरोदिया यांनी भळगट परिवाराच्या वतीने आभार व्यक्त केले. मयूर फिरोदिया, वसंत फिरोदिया, सौ. मयूरी कटारिया, वर्धमान गुगळे, डॉ. संजय भळगट यांनी मनोगत व स्तवन म्हटले. सूत्रसंचालन गदिया सर यांनी केले. यावेळी महिला मंडळाच्या वतीने भावाचा कार्यक्रम झाला. यावेळी प्रभावना व गौतमप्रसादीची व्यवस्था करण्यात आली होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाचे पदाधिकारी अभय कोठारी, सुरेश पगारिया, प्रमोद गादिया, ऋषभ गांधी, अनिल मुथा, योगेश मांडोत, महेश मुनोत, प्रविण कटारिया, परितोष मुथा, रमेश गुगळे, ताराचंद डुंगरवाल, जगदीश मुथा, संतोष गुगळे, अमृत भंडारी यांनी परिश्रम घेतले. महिला मंडळ, युवक युवती यांच्या सहभागातून हा तप महोत्सव कार्यक्रम यशस्वी रितीने पार पडला, अशी माहिती संघाचे अध्यक्ष अभय कोठारी यांनी दिली.

# अनुप्रेक्षाजी म.सा. यांना नवीपेठ स्थानकात येण्याची विनंती

नगर – नगरमधील आगरकर मळा स्थानकात अनुप्रेक्षाजी म.सा. आदी ठाणा २ यांच्या पावन सान्निध्यात चातुर्मास उत्साहात पार पडत आहे. नवीपेठ स्थानक येथील श्रावक श्राविकांनी अनुप्रेक्षाजी म.सा. यांची आगरकर मळा येथे भेट घेत चातुर्मासानंतर त्यांना आठ दिवस नवीपेठ स्थानकात येण्याची आग्रहपूर्वक विनंती केली. यावेळी अलका कटारिया, उल्का सोळंकी, मङ्गुमबाई बरमेचा, भावना कटारिया, योगिता भंडारी, अमोल कटारिया, पारस लोढा, सुभाष भंडारी, भरत बागरेचा, जयंतीलाल बागरेचा, ईश्वर नहार आदी उपस्थित होते. यावेळी चातुर्मासानिमित्त ३१ उपवास केल्याबद्दल लतिका सुनील भळगट यांचा नवीपेठ संघाच्या वतीने सन्मान करण्यात आला.



नवीपेठ स्थानक येथील श्रावक श्राविकांनी अनुप्रेक्षाजी म.सा. यांची आगरकर मळा येथे भेट घेत चातुर्मासानंतर त्यांना आठ दिवस नवीपेठ स्थानकात येण्याची आग्रहपूर्वक विनंती केली.

### नवीपेठ संघाकडून साध्वीजींना आदरपूर्वक निमंत्रण

अलका कटारिया म्हणाल्या, आगरकर मळा येथे अनुप्रेक्षाजी म.सा. यांच्या सान्निध्यात चातुर्मास विविध धार्मिक कार्यक्रम, प्रवचन, जप तप आराधना करून साजरा होत आहे. या परिसरातील वातावरण भक्तिमय बनले आहे. लवकरच चातुर्मासाची सांगता होऊन महासतीजी विहार करणार आहेत. या दरम्यान त्यांनी नवीपेठ स्थानकात आठ दिवस विहार करावा अशी विनंती आहे. त्यांचा पावन सान्निध्याचा आणि अनमोल मार्गदर्शनाचा लाभ मिळण्यास सर्व जण उत्सुक आहेत. साधू संत येती घरा तोची दिवाळीचा दसरा याची अनुभूती आम्हाला सर्वांना येईल अशी भावना कटारिया यांनी व्यक्त केली.

यावेळी सुभाष भडांरी व पारस लोढा यांनी ऐतिहासिक चातुर्मासाबद्दल आगरकर मळा संघाचे कौतुक करून अभिनंदन केले. नवीपेठ स्थानक येथे दर शुक्रवारी रात्री ९ वाजता आनंदचालिसा पाठ कार्यक्रम होत असतो. याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहनही भंडारी व लोढा यांनी केले.



सावेडी जेष्ठ नागरीक मंचची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. यावेळी उपस्थित कार्यकारणी मंडळ. (छाया – हेमंत ढाकेफळकर)

# सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचची वार्षिक सर्वसाधारण सभा

नगर – सावेडी जेष्ठ नागरीक मंचची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शरद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात झाली. सर्व प्रथम दिवगंत सभासदांना श्रद्धाजंली अर्पण करुन सभेची सुरुवात करण्यात आली. मागील वर्ष २०२४–२५ च्या कामकाजाच्या अहवालाचे वाचन कार्यवाहक ज्योती केसकर यांनी केले. तर सभेचे इतिवृत्त शरद कुलकर्णी यांनी वाचले. अहवाल, अंदाजपत्रक व मागील वर्षाचे आर्थिक पत्रके इत्यादींना यावेळी एकमताने सभेने मंजुरी दिली. मंचच्या आर्थिक व्यवहार व इतर कार्यासंबधी अशोक काळे, सर्वेत्तम क्षिरसागर, व श्रीकांत नाईक यांनी या संदर्भात प्रश्न विचारले. सभासदांच्या प्रश्नांचे व शंकांचे समाधान मंचाचे अध्यक्ष शरद कुलकर्णी यांनी केले व त्यांच्या सुचनांची दखल घेण्यात आली.

पेन्शनर्स असोसिएशनचे राज्यस्तरीय अध्यक्ष सर्वेत्तम क्षिरसागर झाल्याबद्दल तर महिला मंडळा संस्थेच्या सलग तिसऱ्यांदा अध्यक्ष झाल्याबद्दल ज्योती केसकर यांचे आणि निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळल्याबद्दल मानकरी हरिचंद्र ठिगळे यासर्वांचे मंचातर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी मंचातर्फे सभासदांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचान मोरेश्वर मुळे यांनी केले. बलभिम पांडव यांनी आभार मानले. समारोपाप्रसंगी अल्पोपहार व चहापान देवुन सभा झाली.

# गौतम निधीच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा उत्साहात

## राजेंद्र दर्डा यांच्या अध्यक्षस्थानी तर जैन कॉन्फरन्सचे बाबूशेठ बोरा यांच्या उपस्थितीत गौतम निधीचा सोहळा

पुणे – जैन समाजातील एकता, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा उत्कृष्ट संदेश देणारा गौतम निधीच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा पुण्यातील वर्धमान सांस्कृतिक केंद्र येथे उपाध्याय प्रवीणऋषीजी म.सा. यांच्या मंगल सान्निध्यात उत्साहात झाला.




गौतम निधीच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा पुण्यात उत्साहात पार पडला.

या सोहळ्यात राष्ट्रीय अध्यक्षपदी पंकज फुलफगर, महामंत्रीपदी नितीन संकलेचा, महाराष्ट्र राज्य प्रमुखपदी संतोष ललवाणी, राज्य महामंत्रीपदी पवन भंडारी, पुणे जिल्हा प्रमुखपदी सुरेश गांधी तर जिल्हा महामंत्रीपदी जितेंद्र मुनोत यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री राजेंद्र दर्डा होते, तर अहिल्यानगरचे समाजसेवक व अखिल भारतीय श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स चे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. कार्यक्रमास राष्ट्रीय निमंत्रक सुनिल नहार, राष्ट्रीय संयोजक अनिल नहार, चातुर्मास समितीच्या स्वागत अध्यक्षा राजश्री पारख तसेच पुणे शहर जितो प्रमुख इंद्रकुमार छाजेड यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

या प्रसंगी आपल्या आशीर्वचनांत प्रवीणऋषीजी म.सा. म्हणाले, गौतम निधीची प्रगती दिवसेंदिवस वाढत आहे. नवीन अध्यक्ष पंकज फुलफगर यांच्या नेतृत्वाखाली संस्था समाजोपयोगी कार्यात नवे आदर्श निर्माण करेल.

आपल्या मनोगतात राजेंद्र बाबू दर्डा म्हणाले, गौतम निधीच्या माध्यमातून सेवा, शिक्षण आणि विकास या तिन्ही क्षेत्रांत जैन समाजाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. समाज uplift करण्याची ताकद या संस्थेमध्ये आहे. अतिशय योग्य नेतृत्व पंकज फुलफगर यांच्या रूपाने संस्थेला लाभले आहे.

या वेळी अशोक बाबूशेठ बोरा यांनी गौतम निधीच्या संकल्पनेविषयी मनोगत व्यक्त करताना सांगितले की गौतम निधी कलश ही अत्यंत प्रेरणादायी कल्पना प्रवीणऋषीजी म.सा. यांच्या संकल्पनेतून साकारली गेली आहे. प्रत्येक जैन परिवाराने आपल्या घरात हा कलश ठेवावा आणि दररोज काही ना काही अनुदान भावपूर्वक जमा करावे, हाच यामागील हेतू आहे. महिन्याच्या शेवटी या सर्व घरांतील कलशांमधून जमा झालेली ही रक्कम एकत्र केली जाते आणि ती शैक्षणिक, धार्मिक तसेच सामाजिक कार्यासाठी उपयोगात आणली जाते. हे केवळ दान नाही, तर समाजाच्या उत्थानासाठी प्रत्येक घराचा थेंबाथेंब एकत्र येऊन तयार होणारा महासागर आहे. त्यांनी पुढे सांगितले की, गौतम निधी हे केवळ आर्थिक उपक्रम नसून, ते विश्वास, श्रद्धा आणि एकतेचे प्रतीक आहे. प्रत्येक समाजबांधवाने या सेवायज्ञात तन, मन आणि धनाने सहभागी व्हावे, हीच खरी गुरूदेवांच्या शिकवणीची पूर्ती ठरेल.

या शपथविधी सोहळ्याने जैन समाजात एकतेचा, सेवाभावाचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट संयोजन राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश कोचेटा यांनी केले, तर आभार प्रदर्शन महामंत्री नितीन संकलेचा यांनी केले. संपूर्ण देशभरातून आलेल्या एक हजाराहून अधिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत भावपूर्ण आणि यशस्वीपणे झाला.



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये जनरल शास्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन उद्योजक अमोल पटवा व रौनक शेटीया यांच्या हस्ते दीपप्रज्वलाने करण्यात आले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णांसाठी आधारवड

## अमोल पटवा यांचे प्रतिपादन; जनरल शस्त्रक्रिया शिबिरात १११ रुग्णांची तपासणी

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून निस्वार्थपणे व सेवाभावी वृत्तीने रुग्णसेवेचे कार्य केले जात आहे. या हॉस्पिटलच्या शिबिराच्या माध्यमातून सेवा करण्याची संधी पटवा व शेटीया परिवाराला दिली. हे आमचे भाग्य समजतो. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांचा कृपा आशीर्वाद रुग्णांना मिळत असल्याने हजारो रुग्णांचे प्राण आजपर्यंत वाचले आहेत. येथील सर्व डॉक्टर्स, नर्सेस व कर्मचारी अत्यंत तळमळीने ईश्वर कार्य समजून रुग्णसेवेचे कार्य अहोरात्र करीत आहेत. शिबिराच्या माध्यमातून सवलतीच्या दरात आरोग्य सेवा मिळत असल्यामुळे आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णांसाठी आधारवड बनले आहे, असे प्रतिपादन उद्योजक अमोल पटवा यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये जनरल शास्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन उद्योजक अमोल पटवा व रौनक शेटीया यांच्या हस्ते दीपप्रज्वलाने करण्यात आले. यावेळी शिबिराचे आयोजक विपुल शेटीया, अमोल पटवा, रौनक शेटीया, अनितातार्इ शेटीया, पल्लवीतार्इ पटवा, प्राची पटवा, शौर्य पटवा, श्रुती पटवा आदींसह जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारीया, डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, वसंत चोपडा शिबिराचे तज्ञ डॉक्टर जनरल सर्जन डॉ.महेश घुगे, डॉ.भास्कर जाधव, विवेक भापकर, डॉ.प्रविण मुनोत आदी उपस्थित होते.

रौनक शेटीया म्हणाले, राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या कृपा आशीर्वादाने सुरू झालेल्या आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. या उद्देशाने रुग्णसेवेचे कार्य होत आहे. येथे येणाऱ्या रुग्णांना दवा आणि दुवा दोन्ही मिळत असल्याने रुग्ण बरे होऊन समाधानी होत आहेत. या शिबिरासाठी पटवा व शेटीया परिवाराला सहभागी करून घेतले आहे. या पुढील काळातही शिबिराच्या माध्यमातून रुग्णसेवा करण्यासाठी आम्ही तत्पर आहोत.

डॉ. महेश घुगे म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आत्याधुनिक पद्धतीने व प्रगत तंत्रज्ञानानुसार योग्य निदान करून उपचार करण्यात येत आहेत. प्रत्येकाने आजार होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे. सुदृढ आरोग्यासाठी नियमित व्यायाम, चालणे, फिरणे व योग्य आहार आवश्यक आहे.पालेभाज्या, ड्रायफूट्स, फलाहार व सकस आहार घेणे महत्त्वाचे आहे. शिबिराच्या माध्यमातून सवलतीच्या दरात जनरल शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन आनंदऋषीजी हॉस्पिटल मार्फत केले जात आहे. या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन डॉ.घुगे यांनी यावेळी केले.

प्रास्ताविकात डॉ.प्रकाश कांकरिया म्हणाले, प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा.यांच्या प्रेरणेने व जैन सोशल फेडरेशनच्या योगदानातून सुरू झालेल्या आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रुग्ण सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. या ब्रीदवाक्यप्रमाणे सेवा कार्य सुरू आहे. समाजातील अनेक दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे मोठ्या प्रमाणात शिबिराच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा घडत आहे. पटवा व शेटीया परिवार सामाजिक कार्यात अग्रेसर असून आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्यात जोडला गेलेला आहे.

या शिबिरात १११ रुग्णांनी लाभ घेतला. डॉ. आशिष भंडारी यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# माणुसकी, एकता, बंधुत्वाचा व मानवतेचा संदेश 'रक्तदान' देतो

## मौलाना अदनान कादरी यांचे प्रतिपादान; अल करम हॉस्पिटलचे शिबिर

नगर – माणूस कितीही मोठा झाला, तरी त्याची खरी ओळख त्याच्या मानवतेतून ठरते. धर्म, जाती, भाषा, प्रांत या साऱ्या सीमांपलीकडे जाऊन जेव्हा एखादा माणूस दुसऱ्या माणसाला जीवनदान देतो, तेव्हा ती कृती फक्त सामाजिक नाही, तर राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक बनते. रक्त कोणाचे हिंदूचे, मुसलमानाचे, शीखाचे, ख्रिश्चनचे असे नसते; रक्त असते लाल रंगाचे आणि हाच लाल रंग आपल्या एकतेचा, बंधुत्वाचा, आणि मानवतेचा संदेश देतो, असे प्रतिपादन नालबंद मस्जिदचे पेशइमाम मौलाना अदनान कादरी यांनी केले.



अल करम हॉस्पिटलच्या वतीने जिल्हा रुग्णालयाच्या रक्त तुटवडा व रक्तदानाच्या आवाहनास अनुसरून तातडीचे रक्तदान शिबिर अल करम हॉस्पिटल किंग गेट रोड रामचंद्रखुंट येथे आयोजित करण्यात आले होते.

अल करम हॉस्पिटलच्या वतीने जिल्हा रुग्णालयाच्या रक्त तुटवडा व रक्तदानाच्या आवाहनास अनुसरून तातडीचे रक्तदान शिबिर अल करम हॉस्पिटल किंग गेट रोड रामचंद्रखुंट येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी मौलाना अदनान कादरी, अल करम हॉस्पिटलचे डॉ. जहीर मुजावर, पटेल स्पेशालिटी क्लिनिकचे डॉ. अशफाक पटेल, फारूक शेख, जिल्हा रुग्णालयाच्या रक्त संकलन अधिकारी सुमैय्या खान, अरशद सय्यद, एडवोकेट ताज सय्यद, राजीक खान, इमरान शेख आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना मौलाना अदनान कादरी म्हणाले की, रक्तदान म्हणजे जिवंत असताना केलेले सर्वात मोठे दान आहे. यामुळे आपण समाजाशी जोडले जातो, आणि राष्ट्राशी आपले नाते अधिक दृढ होते. राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश जेव्हा वेगवेगळ्या धर्माचे, भाषेचे, प्रदेशाचे लोक एका रक्तदान शिबिरात एकत्र येतात, तेव्हा एक सुंदर संदेश तयार होतो. आपण सारे भारतीय एक आहोत! आपले रक्त वेगळे नाही, आपली मने वेगळी नाहीत, आणि आपली भावना एकच माणुसकी आणि एकता, असे सांगितले.

प्रास्ताविक करताना डॉ.जहीर मुजावर यांनी रक्तदानाचे महत्त्व, रक्तदान म्हणजे फक्त रक्त देणे नव्हे, ते म्हणजे जीवन देणे, आशा देणे आणि मानवतेचे बंध मजबूत करणे.

एक युनिट रक्त देऊन आपण तीन लोकांचे प्राण वाचवू शकतो यापेक्षा मोठे दान दुसरे कोणतेच असू शकत नाही असे सांगितले.

मनोगत व्यक्त करताना डॉ. अशफाक पटेल यांनी रक्तदानाचे विविध फायदे रक्तदात्याला कसे होतात या सर्व बाबींचा विस्तृत उहापोह केला.

जिल्हा रुग्णालयाच्या रक्त संकलन अधिकारी सुमैय्या खान यांनी अल करम हॉस्पिटल व सर्व रक्तदात्यांचे आभार मानून भविष्यात पण असेच रक्तदान करून सहकार्य करण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचालन तौफिक तांबोली यांनी केले. शेरअली शेख यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाहनवाज तांबोली, समीर सय्यद, सरफराज कुरेशी, एजाज तांबोली, शोएब शेख व अल करम हॉस्पिटलच्या सर्व संचालक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# अधिवक्ता परिषदेच्या न्याय केंद्राच्या माध्यमातून गरजूंना चांगले कायदेशीर सहकार्य मिळेल

## जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील यांचे प्रतिपादन; जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन

नगर – जिल्हा न्यायालयाच्या जुन्या इमारतीशी सर्व वकिलांचे ऋणानुबंध जुळले आहेत. या इमारतीत आल्यावर एक सकारात्मक ऊर्जा जाणवते. अशा चांगल्या इमारतीत आता अधिवक्ता परिषद न्याय केंद्राचे कार्यालयाल सुरु झाले आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून गरजूंना चांगले कायदेशीर सहकार्य मिळेल. या कार्यालयास जिल्हा सरकारी वकील म्हणून सर्वतोपरी सहकार्य करू, असे आश्वासन जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील यांनी दिले.

जुन्या न्यायालयामध्ये अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेच्या अहिल्यानगर जिल्हा न्याय केंद्राच्या कार्यालयाचे उद्घाटन जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलनाने झाले. यावेळी केंद्रीय कार्यकारणी सदस्या ॲड.अर्पिता झरकर, विभाग प्रमुख ॲड.सुधीर भागवत, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष ॲड.युवराज पोटे, महामंत्री ॲड.विनोद गायकवाड, उपाध्यक्ष ॲड.सुनील सुर्यवंशी व ॲड.पृथ्वी डापसे, सहमहामंत्री ॲड.विकास सांगळे, कार्यालय प्रमुख ॲड.कौस्तुभ कुलकर्णी, कोषाध्यक्ष ॲड.अमीत झरकर, न्याय केंद्र प्रमुख ॲड.विनायक सांगळे, न्याय प्रवाह प्रमुख ॲड.योगेश दहातोंडे आदींसह वकील वर्ग उपस्थित होता.



अ. भा. अधिवक्ता परिषदेच्या अहिल्यानगर जिल्हा न्याय केंद्राच्या कार्यालयाचे उद्घाटन करताना जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील.

यावेळी ॲड.युवराज पोटे म्हणाले, अहिल्यानगर मध्ये अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेचे काम सुरु झाले आहे. सर्वसामन्यांना चांगला न्याय मिळावा यासाठी कायदेविषयक मार्गदर्शन, सहकार्य यामाध्यमातून करणार आहोत. या कार्यालयाचा जास्तीत जास्त लाभ सर्व गरजू पक्षकारांनी घ्यावा, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात न्याय केंद्र प्रमुख ॲड.विनायक सांगळे म्हणाले, न्याय सर्वांसाठी ही राज्य घटनेची संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी अखिल भारतीय अभिवक्ता परिषदेचे काम सुरु आहे. प्रत्येक गरजू नागरिकास कायदेशीर मदत उपलब्ध करून देणे. तसेच गरीब, असहाय्य नागरिक व महिलांना, कामगार, बालके यांना न्यायाच्या प्रवाहात आणण्याचे काम येथून होत आहे.

या कार्यक्रमास डॉ. गिरीश कुलकर्णी, अतिरिक्त सरकारी वकील अनिल घोडके, ॲड. सी. डी. कुलकर्णी, ॲड.विजय महाजन, ॲड.शिवाजी सांगळे, ॲड. लक्ष्मण कचरे, ॲड. सुरेश लगड, ॲड. पी. डी. शहाणे, ॲड. योगेश दहातोंडे, ॲड.दीपक धीवर, ॲड.अमोल डोंगरे, ॲड.संतोष कांडेकर, ॲड.अभिषेक पगारिया, ॲड.सुधीर बाफना आदी उपस्थित होते.



अहिल्यानगर येथील कौटुंबिक न्यायालय येथे वकील संरक्षण कायदा लागू व्हावा म्हणून सर्व वकील बंधू भगिनींनी लालफिती लावून न्यायालयीन कामकाजास सुरुवात केली.

# लालफिती लावून वकीलांची न्यायालयीन कामकाजास सुरुवात

नगर – अहिल्यानगर येथील कौटुंबिक न्यायालय येथे वकील संरक्षण कायदा लागू व्हावा म्हणून सर्व वकील बंधू भगिनींनी लालफिती लावून न्यायालयीन कामकाजास सुरुवात केली. वकील संरक्षण कायदा लागू व्हावा म्हणून महाराष्ट्रातील संपूर्ण वकिलांनी अनेक वेळा अनेक प्रकारे शासनदरबारी निवेदन देऊन पाठपुरावा करुनही ऊपयोग झाला नाही. शासनाला जाग यावी म्हणून बार काउन्सिल ऑफ महाराष्ट्र यांचे निर्देशानुसार आज संपूर्ण महाराष्ट्रात वकीलांनी लालफिती लावून कामकाजास सुरुवात केली. यावेळी कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष ॲड. सुरेश लगड, संस्थापक अध्यक्ष ॲड. शिवाजी कराळे, कार्याध्यक्ष ॲड. शिवाजी सांगळे, सचिव ॲड. राजेश कातोरे, ॲड. पोपट म्हसके, कल्याण पागर, ॲड. मनोज जायभाये, ॲड. रघुनाथ बनकर, वैभव कदम, ॲड. योगेश दहातोंडे, ॲड. सुजाता बोडखे, ॲड. भाग्यश्री गोरे, बबनराव झगडे, ॲड. विराज लगड, ॲड. युवराज पोटे, ॲड. विनायक सांगळे, ॲड. सुधीर भागवत, ॲड. दिपक धिवर, प्रभाकर शहाणे, ॲड. लता गांधी, ॲड. संतोष कांडेकर, कौस्तुभ कुलकर्णी, ॲड. आनंद सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

यावेळी ॲड. शिवाजी कराळे यांनी सांगितले की जर यापुढे वकीलांवर हल्ला झाला तर त्यास जशास तसे उत्तर दिले जाईल.

अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे यांनी सांगितले की शासनाने क्षणाचाही विलंब न करता, वकील संरक्षण कायदा मंजूर करावा.

# गंभीर गुन्ह्यातून आरोपातून न्यायालयाने केले दोषमुक्त

नगर – कोतवाली पोलीस स्टेशन अ.नगर येथे गु.र.नं.७९२/२०२१ नुसार भा.द.वि. क.४२०,२८५ जिवनावश्यक वस्तू कायदा कलम, स्फोटक कायदा कलम पेटोलियम कायदा कलम अशी गंभीर कलम लावून मयुर प्रकाश बडे व इतर व्यक्तींना गुन्ह्यात आरोपी केले होते. वरील कलमा नुसार बेकायदा बायोडिझेल सदृष्य इंधन विक्री, सरकारची फसवणूक करत असल्याबाबतचा गुन्हा दाखल करुन कोतवाली पोलीस स्टेशन अ.नगर यांनी सदर गुन्ह्याचा सखोल समांतर तपास करुन अ.नगर येथील जिल्हा न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. तथापि सदर आरोपी विरूध्द सदर दोषारोप पत्रात सबळ व ठोस पुरावा आढळून आला नाही.

सदर गुन्ह्याशी मयुर बडे यांचा संबंध नाही, यासाठी आरोपीतर्फे ॲड. सचिन पाठक यांनी कनिष्ठ न्यायालयात डिस्चार्ज अप्लिकेशन अर्ज दाखल केले होते. हा अर्ज कनिष्ठ न्यायालयाने नामंजूर केला होता. या निकालावरोधात आरोपीतर्फे ॲड. सचिन पाठक यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात पुनर्निरीक्षण अर्ज दाखल केला होता. या अर्जावर पूर्णपणे युक्तीवाद करून कनिष्ठ न्यायालयाने कशाप्रकारे अयोग्य निकाल देवून अर्ज नामंजूर केला तसेच ठोस पुरावा आरोपीविरूध्द दाखल नाही. सदर आरोपीचा सदर गुन्ह्याशी संबंध नाही. बायोडिझेल सदृष्य इंधन सदर आरोपी विक्री करत होता किंवा इतर आरोपीना मदत करत होता. असा आरोप ठेवण्यात आलेला होता. परंतु तसा एकही पुरावा उपलब्ध नव्हता. सदर उपनगरातील केडगांव येथील व्यवसाईक असून प्रतिष्ठित व्यक्ती असून सदर गुन्ह्यात यांचा सहभाग नाही.पोलीसांनी दोषारोप पत्र दाखल केले होते.

तथापी सर्व दोषारोप पत्रात आरोपीबाबतीत तीळमात्र ठोस पुरावा उपलब्ध नव्हता. या सर्व गोष्टी न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिले व विनाकारण गुन्ह्यात या आरोपीस अडकविण्यात आले आहे. हे ॲड. सचिन पाठक यांनी न्यायालयाच्या नजरेस आणून दिले. या आधारावर व न्यायालयांच्या समोर आलेला सर्व पुरावा या आधारावर प्रधान जिल्हा न्यायालयाने आरोपी यांस गुन्ह्यातून वगळले व तसा आदेश पारीत करून कनिष्ठ न्यायालयाचा २८ एप्रिल २०२५ रोजीचा आदेश सेट असाईड करण्यात आला. कनिष्ठ न्यायालयाचा आदेश रद्द करून सदरचे पुनर्निरीक्षण ॲप्लिकेशन अर्ज मान्य केला. आरोपीतर्फे ॲड. सचिन पाठक यांनी कामकाज पाहिले.



कै. पुंडलकराव भोसले स्केटिंग स्टेडियम येथे जिल्हा संघटनेच्या वतीने २ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तर रोलर ॲथलेटिक्स स्पर्धा व राज्य निवड चाचणी आयोजित अहिल्यानगर जिल्हा रोलर ॲथलेटिक्स संघटना ही स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया मान्यताप्राप्त संघटना आहे.

# अहिल्यानगर जिल्हा रोलर ॲथलेटिक्स स्पर्धा

नगर – कै. पुंडलकराव भोसले स्केटिंग स्टेडियम येथे जिल्हा संघटनेच्या वतीने २ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तर रोलर ॲथलेटिक्स स्पर्धा व राज्य निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. अहिल्यानगर जिल्हा रोलर ॲथलेटिक्स संघटना ही स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया मान्यताप्राप्त संघटना आहे.

स्पर्धांमध्ये जिल्ह्यातून खेळाडूंनी सहभाग नोंदविला. निकाल खालील प्रमाणे – रावी देशपांडे (६ वर्ष इनलाईन प्रथम), शिवांश पाटील (रिक्रेशनल इनलाईन ८ वर्ष प्रथम), विआन मुथा (इनलाईन ८ वर्ष प्रथम), जय भंडारी (क्वाड ८ वर्ष प्रथम), शिवम लवटे (क्वाड ९ वर्ष प्रथम), ऋग्वेद रुपणार (क्वाड ९ वर्ष द्वितीय), हिंदवी राउत (इनलाईन १० वर्ष प्रथम), आरना आबाद (रिक्रिएशन इनलाईन १० वर्ष प्रथम), आराध्या शहाणे (क्वाड १० वर्ष प्रथम), भावेश गुगळे (इनलाईन १० वर्ष प्रथम), यश जाधव (क्वाड १० वर्ष इनलाईन (प्रथम), देवांश राठोड (११ वर्ष क्वाड प्रथम), मयंक बोथरा (११ वर्ष क्वाड द्वितीय), अनय आबाद (१२ वर्ष क्वाड प्रथम), सोहम शिंदे (१३ वर्ष क्वाड प्रथम), वैभव पाटोळे (१३ वर्ष क्वाड द्वितीय), भावेश वाघ (१३ वर्ष इनलाईन प्रथम), ईश्वरी आव्हाड (१४ वर्ष क्वाड प्रथम), कृष्णा साकला (१६ वर्ष क्वाड प्रथम), रत्नवीरा खारटमल (१६ वर्ष क्वाड प्रथम).

पंच म्हणून ॲड. गौरव डहाळे, पीयूष कदम, प्रतीक्षा पाटोळे यांनी काम पाहिले तर प्रशांत पाटोळे व प्रदीप पाटोळे यांच्या मार्गदर्शना खाली वरील स्पर्धा पार पडल्या. विजेत्या खेळाडूंची निवड खोपोली, रायगड जिल्हा येथे होणाऱ्या राज्यस्तर स्पर्धांसाठी निवड झाली असून १५ व १६ नोव्हेंबर रोजी या राज्यस्तर स्पर्धा होणार असल्याची माहिती सचिव प्रशांत पाटोळे यांनी दिली.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन वाढण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटू

## महेंद्र गंधे यांचे प्रतिपादन; महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स संघटनेची नगरमध्ये बैठक

नगर – अनेक सरकारी खात्यातीलसेवानिवृत्तकर्मचाऱ्यांना अत्यल्प पेन्शन मिळते. त्यामुळे त्यांची फार बिकट अवस्था होत असून घरगुती प्रश्न वाढत आहेत. म्हणून सर्व पेन्शनधारक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी संघटित होऊन आपली ताकद दाखवणे आवश्यक आहे. कामगार नेते दत्ता सामंत यांच्याप्रमाणे काम करा; मी तुमच्या बरोबर आहे. सेवानिवृत्तांचे प्रलंबित प्रश्न व पेन्शन वाढी विषयी लवकरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊ त्यांच्याकडे गाऱ्हाणे मांडू. तसेच नगरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मेळाव्याचे आयोजनही करू. पेन्शन धारकांचे सर्व प्रश्न सुटण्यासाठी मी पूर्णपणे सहकार्य करणार आहे, असे प्रतिपादन भाजपाचे माजी शहर जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे यांनी केले.



नगरमध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स संघटनेच्या बैठकीत मार्गदर्शन करताना भाजपाचे माजी शहर जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे. यावेळी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स संघटनेची बैठक अहिल्यानगर मध्ये महेंद्र गंधे यांच्या संपर्क कार्यालयात झाली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष एस. एल. दहिफळे, सरचिटणीस सुभाष कुलकर्णी, उपाध्यक्ष बाबुराव दळवी, ज्ञानदेव आहेर, अंकुश पवार व एस. के. सय्यद, चिटणीस आबा सोनवणे, अशोक पाटील, खजिनदार त्रिंबक घुगरकर व जील्यातून आलेले सदस्य उपस्थित होते. या बैठकीमध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन वाढण्यासाठी उपाययोजना राबवण्यावर तसेच करण्यात येणाऱ्या आंदोलनावर चर्चा करण्यात आली.

प्रास्ताविकात सुभाष कुलकर्णी म्हणाले, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये एकता नसल्याने त्यांचे प्रश्न अद्याप सुटलेले नाहीये. त्यामुळे आपला सरकारवर दबाव पडत नसल्याने पेन्शन वाढीचा विचार सरकारच्या विचारधन अद्याप आलेला नाही. केंद्र सरकार आठवा वेतन आयोग जाहीर करते पण सेवांवृत्तांची पेन्शन वाढवत नाही; हा आमच्यावर अन्याय आहे. म्हणून संघटित होऊन लढा देणे आवश्यक आहे. आपले प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाच फक्त आम्हाला आशेचा किरण आहे. कारण त्यांनी अनेक जटील व प्रलंबित प्रश्न सोडवले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांपर्यंत पोहोचण्यासाठी अहिल्यानगरचे महेंद्र गंधे यांनी आम्हाला सहकार्य करावे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामार्फत केंद्र सरकारपर्यंत आम्ही गाऱ्हाणे मांडणार आहोत.

# काष्टी येथे १७ नोव्हेंबर रोजी अनुज्ञप्ती शिबीर

नगर – प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने काष्टी (ता. श्रीगोंदा) येथे १४ नोव्हेंबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात अनुज्ञप्ती शिबिराचे आयोजन करण्यात येणार होते. परंतु १४ व १५ नोव्हेंबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात जनावरांच्या खरेदी–विक्रीचा बाजार भरविण्यात येणार असल्याने हे अनुज्ञप्ती शिबिर १७ नोव्हेंबर रोजी त्याच ठिकाणी म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समिती, काष्टी येथे आयोजित करण्यात आले आहे.

सर्व नागरिकांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी केले आहे.



# पोळीचा पौष्टिक रोल

झटपट रेसिपी

दोस्तांनो, उरलेल्या पोळ्यांचं काय करायचं, हा प्रश्न तुम्हाला नक्कीच पडला असेल. फोडणीची पोळी नेहमीच केली जाते. पण तुम्ही वेगळी रेसिपीही करू शकता. उरलेल्या पोळ्यांचा पौष्टिक रोल करता येईल.

**साहित्य :** उरलेल्या पोळ्या, एक उकडलेला बटाटा, अर्धी वाटी उकडलेले मटार, अर्धी वाटी किसलेलं पनीर, बारीक चिरलेली सिमला मिरची, एक कांदा आणि टोमॅटो, हिरवी चटणी, टोमॅटो सॉस, जीरं, चाट मसाला, तूप, मीठ.

**कृती :** कढई गॅसवर ठेवा. त्यात तूप घाला. जीरं घालून परता. त्यात कांदा घालून सोनेरी रंगावर परतून घ्या. मग मटार, टोमॅटो आणि सिमला मिरची घालून परता. भाज्या शिजल्यानंतर त्यात पनीर, मीठ आणि चाट मसाला घालून थोडं परतून घ्या. आता हे सारण पोळ्यांमध्ये भरायचं आहे. पोळीवर हिरवी चटणी आणि टोमॅटो सॉस लावून घ्या. त्यावर हे सारण घालून पसरून घ्या. पोळीचे रोल करा. या रोलला दोरा गुंडाळा. मग तव्यावर थोडं तूप घालून पोळीचा रोल परतून घ्या. हा रोल सॉससोबत खाता येईल.




## शेर की जुबानी

जब भी जख्म तेरे यादों
के भरने लगते हैं
किसी बहाने हम तुम्हें
याद करने लगते हैं।

सोच बदलो,
शख्सियत
बदलते
देर नहीं लगेगी।

जिनकी बातों में छलके
अपनापन,
जिंदगी में ऐसे लोग
मिलते बहुत कम।

# अभियंत्याच्या नोकरीवर पाणी सोडून पाण्यातील सोन्याचा शोध!

अविल्हर

जोखीम घेण्याचे धाडस करणाऱ्यांनाच यश मिळते. खांडवा जिल्ह्यातील सुरगाव जोशी गावातील रहिवासी नंदकिशोर पटेल यांना आज 'फिश किंग' म्हणून ओळखले जाते. ते एके काळी अभियंता म्हणून काम करत होते; परंतु आज ते त्यांच्या मत्स्यपालन व्यवसायातून करोडो कमावतात. त्यांची कहाणी केवळ कठोर परिश्रमाचेच नाही, तर मानसिकतेतील बदलाचेही उदाहरण आहे.

नंदकिशोर यांनी आपले सुरुवातीचे शिक्षण त्यांच्या गावात पूर्ण केले आणि नंतर आयपीएस कॉलेजमधून अभियांत्रिकीची पदवी मिळवली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना एका खासगी कंपनीत महिन्याला ५० हजार रुपये पगाराची नोकरी मिळाली. त्यांनी काही वर्षे काम केले; परंतु त्यांना काही तरी वेगळे करण्याची इच्छा होती. त्यांना स्वतःचे असे काही तरी निर्माण करायचे होते, जे त्यांना केवळ यशस्वीच करणार नाही तर इतरांनाही रोजगार देईल. २०१६ मध्ये नंदकिशोर यांनी एक मोठा निर्णय घेतला. त्यांनी त्यांच्या स्थिर नोकरीला निरोप दिला आणि मत्स्यपालन सुरू केले. एक अभियंता आता तलावात मासे पाळत असल्याचे पाहून गावकरी आश्चर्यचकित झाले! पण नंदकिशोर यांना स्वतःवर विश्वास होता. सुरुवातीला त्यांनी फक्त एका तलावापासून सुरुवात केली. सरकारी योजना आणि कृषी विभागाच्या मदतीने त्यांनी मत्स्यपालन तंत्र शिकले. हळूहळू, त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा वापर करून त्यांनी एबीसी मॉडेल (वायुवीजन, प्रजनन आणि काळजी) अंतर्गत मत्स्यपालनाची योजना आखली. यामुळे माशांच्या वाढीला वेग आला आणि उत्पादनात लक्षणीय वाढ झाली.





नंदकिशोर पटेल यांच्याकडे आज चार ते पाच मोठे तलाव आहेत. त्यात ते रोहू, कटला, मृगल आणि ग्रास कार्प सारख्या माशांच्या प्रजातींचे प्रजनन करतात. त्यांची वार्षिक उलाढाल अंदाजे बारा कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. नंदकिशोर म्हणतात, की सकारात्मक विचारसरणी आणि प्रामाणिक परिश्रमाने कोणत्याही प्रयत्नात यश मिळू शकते. मी अभियांत्रिकीची पदवी मिळवली असेल; परंतु मी शेतात आणि तलावांमध्ये खरे अभियांत्रिकी काम केले. नंदकिशोर मासेपालनात वैज्ञानिक तंत्रांचा वापर करतात. ते तलावातील ऑक्सिजन पातळी, पाण्याची गुणवत्ता आणि तापमान नियंत्रित करण्यासाठी एरेटर मशीन वापरतात. ते माशांना संतुलित खाद्य पुरवतात. त्यामुळे वजन आणि उत्पादन दोन्ही वाढते. ते प्रत्येक बॅचनंतर डेटाचे विश्लेषण करतात आणि कोणत्या हंगामात कोणती प्रजाती अधिक फायदेशीर आहे हे ठरवतात. या नियोजनामुळे त्यांना त्यांच्या तलावांमधून वर्षभर पैसे कमवता येतात.

नंदकिशोर पटेल आता वैयक्तिकरित्या अनेक तरुणांना मत्स्यपालनाचे प्रशिक्षण देतात. ते गावातील बेरोजगार तरुणांना सांगतात, की सरकारी योजनांचा योग्य वापर करून तेही लाखो रुपये कमवू शकतात. आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली डझनभर तरुण मत्स्यपालनातून स्वावलंबी झाले आहेत. ते म्हणतात, सुशिक्षित लोकांना नोकऱ्या मिळतात; परंतु आता सुशिक्षित लोकांनी शेती आणि पशुपालन पुन्हा नव्याने सुरू करण्याची वेळ आली आहे. ही खरोखरच स्वावलंबी भारताची दिशा आहे.


**सरकारी मदतवाढ**

नंदकिशोर यांनी मत्स्यव्यवसाय विभागाच्या प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेचाही फायदा घेतला. या योजनेअंतर्गत त्यांना तलाव बांधणी आणि माशांच्या खाद्यासाठी अनुदान मिळाले. यामुळे त्यांचे खर्च कमी झाले आणि नफा वाढला. आता त्यांच्या ब्रँड नावाखाली ते जवळच्या जिल्ह्यांमध्ये ताजे आणि स्वच्छ मासे पुरवतात.

**यशाचा संदेश**

नंदकिशोर पटेल यांची कहाणी दर्शवते, की कोणतेही काम लहान किंवा मोठे मानू नये.

## टेक्नो टॉक




### तरुणांच्या 'एआय चॅट'वर पालक ठेवू शकतील नियंत्रण

'मेटा'ने केलेल्या बदलांमुळे पालकांना त्यांच्या मुलांचे खासगी 'चॅट्स आणि एआय चॅटबॉट्स' बंद करण्याची परवानगी मिळते. पालक आता एआय चॅट्स नियंत्रित करू शकतील. 'मेटा'ने घोषणा केली आहे, की पुढील वर्षापासून पालकांना आपल्या मुलांच्या 'एआय कॅरेक्टर'सह एक-एक चॅट्स बंद करण्याचा पर्याय असेल. तथापि, 'मेटा'चा एआय असिस्टंट पूर्णपणे बंद केला जाणार नाही. कंपनीने म्हटले आहे, की असिस्टंट फक्त शैक्षणिक आणि उपयुक्त माहिती प्रदान करेल आणि वयानुसार सुरक्षा फिल्टर कायम राहतील. इंस्टाग्रामवरील किशोरवयीन खाती आता डीफॉल्टनुसार पीजी-१३ सामग्रीपुरती मर्यादित असतील. याचा अर्थ असा, की किशोरवयीन वापरकर्ते आता फक्त पीजी-१३ चित्रपटासारखे फोटो आणि व्हिडीओ पाहू शकतील. त्यात नग्नता, ड्रग्जचा वापर किंवा धोकादायक स्टंटसारख्या सामग्रीचा समावेश नसेल. शिवाय, मुले पालकांच्या परवानगीशिवाय ही सेटिंग्ज बदलू शकणार नाहीत. नवीन नियम चॅटबॉट्सवरदेखील लागू होतील. पालकांना सर्व चॅट्स बंद करायचे नसतील, तर ते विशिष्ट चॅटबॉट्स ब्लॉक करण्याचा पर्याय निवडू शकतात. शिवाय, पालकांना आता त्यांच्या मुलांच्या 'एआय कॅरेक्टर'शी झालेल्या संभाषणांबद्दल माहिती मिळेल.

# शिकताना निवडा अर्धवेळ नोकरीचा पर्याय

मार्गदर्शन

करिअरला चालना देण्यासाठी अर्धवेळ नोकरी ही एक चांगली संधी आहे. या नोकऱ्यांच्या माध्यमातून विद्यार्थी केवळ पॉकेटमनी किंवा ट्यूशन फीचा खर्च उचलू शकत नाहीत, तर विद्यार्थ्यांचे कौशल्यदेखील वाढवू शकतात. या डिजिटल युगात, अर्धवेळ नोकऱ्यांच्या जगात अनेक बदल झाले आहेत. विद्यार्थ्यांसाठी आता बऱ्याच संधी आहेत, जिथे ते घरून काम करताना तांत्रिक किंवा सर्जनशीलतेचा वापर करून चांगले पैसे कमावू शकतात. त्याचे बरेच फायदे आहेत. हे विद्यार्थ्यांना जॉब मार्केटचे विविध पैलू समजून घेण्यास मदत करते. यामध्ये कार्यसंस्कृती आणि सांघिक कार्याची आव्हाने दिसून येतात. ती भविष्यात पूर्णवेळ नोकरीसाठी तयार करते आणि मदत करते.



**फ्रीलान्स कंटेंट लेखन किंवा ब्लॉगर**

आपल्याकडे लिहिण्याची कला असल्यास आणि भाषेवर चांगली पकड असल्यास 'फ्रीलान्स कंटेंट' लेखनाची अर्धवेळ नोकरी हा एक चांगला पर्याय आहे. यामुळे लेखक कुठूनही काम करू शकतात. या कामासाठी तुम्हाला जास्त धावपळ करण्याची गरज रहात नाही. याद्वारे तुम्ही लेखनकौशल्य सुधारू शकता आणि विविध क्षेत्रांचे ज्ञान मिळवू शकता. यामध्ये लेखानुसार कमाई निश्चित केली जाते आणि लेखनाचा अनुभव वाढतो.

**ऑनलाइन शिक्षण आणि शैक्षणिक सपोर्ट**

शिकवणे हे एक असे काम आहे, ज्यातून आपण बरेच काही शिकवून आदर मिळवू शकतो. शिकवण्यामधून गती असलेल्या विषयाचे ऑनलाइन कोचिंग सुरू करता येते. या प्रकारच्या कामामध्ये अभ्यास साहित्य तयार करू आणि शेअर करू शकता. मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका सोडवू शकता आणि त्या ऑनलाइन अपलोड करून मागणीनुसार शैक्षणिक सपोर्टद्वारे चांगले पैसे कमवू शकता. ही नोकरी आपले ज्ञान वाढवण्यासाठीही साह्यभूत ठरते आणि आपल्याला शैक्षणिक विषयांवर प्रभुत्व मिळवण्याकामी मदत करू शकते. अशा शिकवणीद्वारे विशिष्ट परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांना ऑनलाइन शिकवणी देता येऊ शकते.

**सोशल मीडिया किंवा डिजिटल मार्केटिंग इंटर्न**

जवळजवळ प्रत्येक छोट्या व्यवसायाला डिजिटल प्रभावाची आवश्यकता असते. पार्टटाईम जॉब्स आपल्याला वास्तविक-जगातील विपणन धोरण, ब्रँडिंग आणि डेटा विश्लेषण यासारखी कौशल्ये शिकवू शकतात. 'सोशल मीडिया'चे ज्ञान असेल तर तुम्ही या कामांमधून चांगले पैसे कमावू शकता. यामध्ये प्रकल्पानुसार चांगले पैसे दिले जातात.

**डेटा एन्ट्री किंवा टेक सपोर्ट**

टायपिंगची गती चांगली असेल किंवा मूलभूत तांत्रिक समस्या चुटक्यात सोडवू शकत असाल, तर तुम्हाला चांगले पैसे कमावण्याची संधी मिळू शकते. कारण अनेक कंपन्या विद्यार्थ्यांना डेटा एंट्री किंवा 'रिमोट वर्क'चा पर्याय देतात आणि हे काम तुम्ही रात्रीही करू शकता.

# प्रेयसीला विसरू शकत नाही!


मॅच मेकिंग

मी २७ वर्षांचा तरुण असून पदवी मिळवल्यानंतर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला आलो. मी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या विषयात पीएचडी मिळवली असून अमेरिकेत उत्तम नोकरी करतो आहे. भारतात असतानाच माझं एका मुलीवर प्रेम होतं. मी आजही तिच्यावर खूप प्रेम करतो. अमेरिकेला आल्यानंतर मी दोनदा भारतात गेलो.त्यावेळी तिच्याशी संपर्क साधला. तिनेही माझे फोन घेतले. मेसेजना उत्तर दिलं. पण गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात भारतात गेलो असताना तिच्याशी संपर्क होऊ शकला नाही. तिने माझे फोनही उचलले नाहीत. मग अचानक तिची लग्नपत्रिकाच माझ्या हाती पडली. यामुळे मला धक्काच बसला. माझं अजूनही तिच्यावर प्रेम आहे. मी काय करू?



**उत्तर :** प्रेयसीचं दुसऱ्या कोणाशी तरी लग्न होत असल्याचा धक्का पचवणं तुला खूप जड गेलं असेल. तो काळ तुझ्यासाठी खूप आव्हानात्मक होता यात शंका नाही. मात्र आपण कोणावरही प्रेमासाठी दबाव टाकू शकत नाही. मात्र आता तू या मुलीला विसरून जाणंच योग्य ठरेल. तू स्वतःमध्ये डोकावून बघ. स्वतःला थोडा वेळ दे. नवे नातेसंबंध जोडण्याचा प्रयत्न कर. नव्या नात्यात अडकणं तुझ्यासाठी सोपं नसेल याची मला पूर्ण कल्पना आहे. त्यातच तुझा दुसऱ्या मुलीवर पटकन विश्वास बसणार नाही. मात्र नात्याकडून तुला नेमकं काय हवं आहे हे जाणून घे. तुझ्यापुढे आयुष्य पडलंय. त्यामुळे स्वतःच्या विकासावर लक्ष केंद्रित कर.

## सोशियल मीडिया



### व्हॉट्सअप न वाचलेल्यांचे संदेश करेल ब्लॉक

संपर्क किंवा व्यवसाय चॅटशी संवाद साधत नसलेल्या वापरकर्त्यांसाठी न वाचलेल्या संदेशांची संख्या मर्यादित करण्यासाठी व्हॉट्स प एका नवीन फीचरची चाचणी करत आहे. एखादी व्यक्ती किंवा व्यवसाय वारंवार संदेश पाठवत असेल आणि तुम्ही ते विशिष्ट कालावधीमध्ये उघडले नाहीत, तर व्हॉट्स प पाठवणाऱ्याचे संदेश तात्पुरते ब्लॉक करेल. वापरकर्त्याने जुने न वाचलेले संदेश वाचल्यानंतर ही मर्यादा आपोआप रीसेट होईल.

वारंवार संदेश पाठवणाऱ्या खात्यांना आळा घालण्यासाठी हे फीचर विकसित केले जात आहे. नवीन संदेश मर्यादा वैयक्तिक आणि व्यावसायिक संदेशांना लागू होईल. व्हॉट्स पच्या प्रवक्त्याने सांगितले, की सरासरी वापरकर्ता क्वचितच या मर्यादेपर्यंत पोहोचेल. कंपनी सध्या वेगवेगळ्या कॅप नंबरसह प्रयोग करत आहे, जेणेकरून फक्त स्पॅमर्स आणि मास मेसेज पाठवणाऱ्यांवर परिणाम होईल. कंपनी स्पॅम आणि बल्क मेसेजिंगच्या समस्येशी बराच काळ झुंजत आहे. व्हॉट्स पने यापूर्वी वापरकर्त्यांना व्यवसाय खात्यांमधून मार्केटिंग संदेशांमधून सदस्यता रद्द करण्याचा पर्याय दिला असला, तरी यामुळे समस्या पूर्णपणे दूर झाली नाही.


अहवालांनुसार, २०२५ च्या पहिल्या सहामाहीमध्ये घोटाळ्याशी जोडले गेल्यामुळे ६८ लाखांहून अधिक खाती ब्लॉक करण्यात आली.

# कसे हाताळायचे हे प्रश्न?

वेगळ्या वाटा

मुलाखतीत उमेदवारांना कल्पकतेची, हजरजबाबीपणाची परीक्षा बघणारे प्रश्न विचारले जातात. अशा प्रश्नांची उत्तरं विचारपूर्वक द्यावी लागतात. अशा प्रश्नांच्या माध्यमातून उमेदवारांची ताणतणावाच्या परिस्थितीचा सामना करण्याची क्षमता तपासली जाते. नोकरी करताना कसोटीचे बरेच प्रसंग येतात. हे प्रसंग अगदी हुशारीने निभावून न्यावे लागतात. उमेदवार अशा प्रसंगांमध्ये नेमकं काय करेल, हे जाणून घेण्यासाठी त्यांना असे प्रश्न विचारले जातात. अशा प्रश्नाची तयारी आधीपासून करता येत नाही. आपल्याला नेमका कोणता प्रश्न विचारला जाईल, याचा अंदाजही बांधता येत नाही. मात्र या टिप्समुळे तुम्ही अशा प्रश्नांना आत्मविश्वासाने सामोरे जाल.

* कोणतीही समस्या विविध मार्गांनी, पद्धतींनी सोडवावी लागते. त्यामुळे समस्यांचं निवारण करण्याच्या तुमच्या पद्धती



मुलाखत घेणाऱ्यांपर्यंत पोहोचायला हव्यात. गोंधळात टाकणाऱ्या प्रश्नांचं उत्तर देताना तुम्ही विविध मार्ग अवलंबू शकता. यामुळे मुलाखत घेणाऱ्यांना तुमच्या क्षमतेचा अंदाज येईल.

* मुलाखतीदरम्यान पेपर, पेन आणि पेन्सिल सोबत ठेवा. काही प्रश्नांची उत्तरं देण्याआधी कागदावर काही गृहितकं मांडावी लागतात. कागद आणि पेनचा वापरण्याआधी मुलाखत घेणाऱ्यांची परवानगी घ्या.

* मुलाखत घेणाऱ्यांना तुम्हीही काही प्रश्न विचारू शकता. मनातल्या शंका दूर करू शकता. प्रश्न विचारताना अजिबात घाबरू नका.

## फिटनेस



### वजन कमी करायला हवं का?

सध्या बरेच जण वजन कमी करण्याच्या मागे असतात. काही जणांचं वजन खरंच जास्त असतं तर काही जण इतरांचं बघून वजन कमी करायला सुरुवात करतात. मनात आलं म्हणून किंवा कोणाचं तरी ऐकून वजन कमी करणं योग्य नाही. यामुळे तुमची रोगप्रतिकारशक्ती कमी होऊ शकते. तुम्ही आजारी पडू शकता. म्हणूनच आपलं वजन योग्य आहे हे कसं ओळखावं याविषयी...

* दररोज उत्साही आणि आनंदी असणं हे तंदुरुस्त असण्याचं लक्षण असतं. तुम्ही उत्साहाने सळसळत असता. तुम्हाला कसलाही कंटाळा येत नाही. सतत नव्याची आस लागून रहाते.

* तुमचं वजन फार वाढत नसेल किंवा कमीही होत नसेल तर शरीराला तुमचं सध्याचं वजन योग्य वाटत असल्याचं समजावं. बरीच वर्षं वजनात वाढ किंवा घट न होणं हे तुमचं वजन योग्य असल्याचं लक्षण आहे.

* आपलं वजन योग्य आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी एक चाचणी करता येईल. तुम्ही विश्रांती घेत असताना हृदयाची गती मोजा. या गतीवरून तुम्हाला तुमच्या तंदुरूस्तीची कल्पना येईल.

# तरुणांना आकर्षण फ्युजन शैलीचे

स्टाईल स्टेटमेंट

सणांच्या हंगामात तरुण मंडळी पेहरावाबाबत अधिकाधिक जागरूक असतात. कुर्ता-पायजामा हा पारंपारिक ट्रेंड असला, तरी या वर्षी तरुण पारंपारिक घटकांसह फ्युजन शैली स्वीकारत आहेत. डिझायनर्स कुर्ता-पायजामासह सतत प्रयोग करत असताना तरुणांवर बॉलीवूड सेलिब्रिटींच्या ड्रेसिंग सेन्सचाही प्रभाव आहे. शहरातील डिझायनर्सच्या मते या सणाच्या हंगामात, कुर्ता शॉर्टसमध्ये दिसतील, तर पायजम्याची जागा रायडर पॅंट्सने घेतलेली पहायला मिळेल. पारंपारिक पार्ट्यांमध्येही ही फ्युजन शैली प्रवेश करत आहे. तरुणांना वरुण धवन आणि अर्जुन कपूर यांच्या शैली विशेष आवडतात. तत्सम डिझाइन तयार करण्यासाठी ते डिझायनर्सना कमिशन देत आहेत.



फॅशन ट्रेंड बदलले आहेत, शहरातील डिझायनर्स प्रयोग करत आहेत. कुर्ते लहान झाले आहेत आणि रायडर्सच्या पॅंटने पायजम्याची जागा घेतली आहे. तरुणांसाठी एक नवीन लूक तयार करण्यासाठी, ते पारंपारिक शैली टाळून लोकांना आकर्षित करत आहेत. अफगाण परिहान, काश्मिरी फिरन आणि नेपाळी दौरा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुर्त्यांच्या शैलींसह सध्या प्रयोग केले जात आहेत. राजस्थानी, भोपाली, लखनौ, मुलतानी, पठानी, पंजाबी आणि बंगाली कुर्त्यांमध्ये या हंगामात लक्षणीय बदल दिसून येत आहेत. कुर्ता आणि पॅन्टसह नेहमीच औपचारिक आणि चामड्याचे शूज वापरले गेले आहेत. आता काही बदलांसह, या शैलीमध्ये स्नीकर्सनेदेखील महत्त्वाचे स्थान घेतले आहे. ते पॅंटसह छान दिसतात आणि पार्ट्यांमध्ये आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतात. या वर्षी, तरुणांमध्ये लहान कुर्ते चर्चेमध्ये आहेत. रायडर्सच्या पॅंटसह लहान कुर्ते सर्वात लोकप्रिय आहेत; परंतु या वेळी पॅंटसह वेस्टर्न धोतीनेदेखील लोकप्रियता मिळवली आहे.

# साहसी पर्यटन करायचे, तर मग ही ठिकाणे निवडा...

भन्नाट भटकंती

भारतातील पर्यटनस्थळे आता धार्मिक स्थळे किंवा ऐतिहासिक स्मारकांपुरती मर्यादित राहिलेली नाहीत. साहसी पर्यटनाची लोकप्रियताही झपाट्याने वाढत आहे. 'रिव्हर राफ्टिंग'ची लोकप्रियता वाढत आहे. अनेकांना वाटते, की राफ्टिंगचा आनंद फक्त ऋषिकेषमध्येच घेता येतो; परंतु हे चुकीचे आहे. भारतातील इतर अनेक राज्यांमध्ये अशा नद्या आहेत ज्या राफ्टिंगचा अनुभव आणि नैसर्गिक सौंदर्य दोन्ही देतात.

**ऋषिकेश**

उत्तराखंडमधील ऋषिकेशचा उल्लेख केल्याशिवाय भारतातील रिव्हर राफ्टिंगबद्दल बोलणे अशक्य आहे. हिमालयाच्या कुशीतून वाहणाऱ्या गंगा नदीचे वेगवान प्रवाह आणि उच्च जलद प्रवाह साहस शोधणाऱ्यांसाठी परिपूर्ण मानले जातात. पहिल्यांदाच राफ्टिंग करणाऱ्या आणि अनुभवी राफ्टिंग करणाऱ्या दोघांसाठीही येथे वेगवेगळ्या पातळीचे वेगवान प्रवाह उपलब्ध आहेत. राफ्टिंगव्यतिरिक्त येथे कॅम्पिंग आणि योगा रिट्रीटदेखील अनुभवता येते.

**कुल्लू-मनाली**


हिमाचल प्रदेशमधील कुल्लू-मनाली हे केवळ हनिमून डेस्टिनेशन नाही, तर राफ्टिंग उत्साहींसाठी एक उत्तम ठिकाण आहे. पाइन जंगले आणि खोल दऱ्यांमधून वाहणारी बियास नदी राफ्टिंगचा थरार वाढवते. पहिल्यांदाच राफ्टिंग करणाऱ्या तसेच अनुभवी राफ्टर्ससाठी या सोयी परिपूर्ण आहेत.

**लडाख**

लडाखमधील झंस्कार नदीवर राफ्टिंग करणे हा एक अनोखा अनुभव आहे. उंच पर्वत आणि खोल दऱ्यांमधून वाहणारी ही नदी साहसप्रेमींसाठी स्वप्नवत आहे. येथील रॅपिड्स थोडे धोकादायक आहेत; परंतु अनुभवी राफ्टर्ससाठी हे ठिकाण खूप खास मानले जाते.

**सिक्कीम**

सिक्कीममधील तिस्ता नदीवर राफ्टिंग केल्याने तुम्हाला हिमालयाचे सौंदर्य अनुभवता येते. या नदीचे रॅपिड्स, स्वच्छ



आणि थंड पाण्यामुळे, नवीन आणि अनुभवी राफ्टर्ससाठी परिपूर्ण आहेत. नदीकाठी असलेली कॅम्प साइट्स आणि निसर्गरम्य दृश्ये हा अनुभव आणखी संस्मरणीय बनवतात.

**भागीरथी नदी**

ऋषिकेशमधील गंगा नदीव्यतिरिक्त, गंगोत्री ग्लेशियरमधून उगम पावणारी भागीरथी नदीदेखील राफ्टिंगसाठी एक उत्तम पर्याय मानली जाते. येथील जलद प्रवाह आणि त्याच्या सभोवतालची हिरवीगार जंगले हे ठिकाण आणखी सुंदर बनवतात. हे ठिकाण साहसासोबतच शांततापूर्ण अनुभव घेऊ इच्छिणाऱ्यांसाठीदेखील आदर्श मानले जाते.

**दांडेली**

कर्नाटकमधील दांडेलीमधून वाहणारी काली नदी राफ्टिंगसाठी ओळखली जाते. घनदाट जंगले आणि टेकड्यांमधून वाहणाऱ्या या नदीत तीव्र प्रवाह आहेत, जे प्रत्येक राफ्टरला थरारक अनुभव देतात. पक्षीनिरीक्षण आणि कॅम्पिंगचा आनंद येथे घेता येतो.

**कोलाड**

महाराष्ट्रातील कोलाडमधून वाहणाऱ्या कुंडलिका नदीवर मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमधून सहज पोहोचता येते. ही नदी वर्षभर राफ्टिंगसाठी योग्य मानली जाते. ती एक लोकप्रिय वीकेंड गेटवे डेस्टिनेशन आहे.

**कूर्ग**

कर्नाटक कूर्गमधील बारापोल नदी कॉफीच्या बागा आणि जंगलांमधून वाहते. येथिल राफ्टिंग मध्यमस्तरीय आहे. त्यामुळे ते नवशिक्या राफ्टर्ससाठी सुरक्षित ठरते.

# रेशन कार्डच्या कामांसाठी मोजावे लागतात हजारो रुपये

## संबंधितांवर कारवाई करण्यासाठी नितीन भुतारे यांचे अन्न धान्य नागरीपुरवठा मंत्र्यांना पत्र



नगर – अहिल्यानगर शहरामध्ये अनेक नागरिकांचे ऑनलाईन रेशन कार्ड करण्याकरिता सेतूमध्ये अर्ज केलेले आहेत. त्यामध्ये काही नागरिकांचे १२ अंकी नंबर करिता काही नागरिकांचे रेशन कार्ड मधील नावे समाविष्ट करण्यात काहींचे रेशन कार्ड मधील दुरुस्ती करिता काहींचे नवीन रेशन कार्ड मिळविण्याकरिता असे अनेक अर्ज सेतू कार्यालयात केलेले आहेत. परंतु वर्ष झाले तरी देखील अशा अनेक नागरिकांचे शहर पुरवठा विभाग यांच्याकडून कामे झालेली दिसत नाही. या कामाकरिता नागरिकांना नाहक पुरवठा विभाग कार्यालयात चकरा माराव्या लागतात. चकरा मारून मारून नागरिक हैराण होतात व त्यानंतर त्या ऑफिसच्या कार्यालयाच्या आजूबाजूला पुरवठा अधिकाऱ्यांनी नेमलेले फिरणारे एजंट कडून ही कामे करून घ्यावी लागतात एजंटकडून काम करून घेतले तर दोन ते पाच दिवसाच्या आत ही सर्व रेशन कार्डची कामे पूर्ण होतात. त्याकरिता ऑनलाइन १२ अंकी नंबर टाकण्यासाठी जवळपास तीन हजार रुपये मागितले जातात. नाव बदलणे, नावे समाविष्ट करणे याकरिता दोन ते तीन हजार रुपये मागितले जातात. नवीन रेशन कार्ड काढण्याकरिता दहा ते पंधरा हजार रुपयांची मागणी एजंटकडून होते, अशा परिस्थितीमुळे अहिल्यानगर शहरातील नागरिकांची मोठी लूट होत असून जिल्हा पुरवठा अधिकारी व शहर पुरवठा अधिकारी यांच्या पाठिंबामुळे आर्थिक लागेबांधे असल्या कारणाने हे एजंटच जाळे मोठ्या प्रमाणात शहरात वाढलेले दिसत आहे. एजंट सर्वसामान्य नागरिकांकडून रेशन कार्ड कामाकरीता पैशे लुटतात व याच पैशातून हप्ते हे जिल्हा पुरवठा अधिकारी व शहर पुरवठा अधिकारी यांच्या खिशात जातात. त्यामुळे अश्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. याबाबतची तक्रार नितीन भुतारे यांनी अन्न धान्य नागरी पुरवठा मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे मेल द्वारे निवेदन पाठवून केली आहे.त्यात संबंधित अहिल्यानगर जिल्हा पुरवठा अधिकारी व शहर पुरवठा अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशीही मागणी करण्यात आली आहे.

### काही दुकानदार सर्वसामान्य नागरिकांना धान्य देत नाही

तसेच रेशन दुकानदारांच्या माध्यमातून सुद्धा मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. अनेक नागरिकांना धान्य मिळत नाही. तरी देखील त्यांनी धान्य नेल्याची नोंद काही दुकानदार करतात तर अनेक नागरिकांना त्यांना मंजूर असलेल्या धान्य पैकी पन्नास टक्केच धान्य दिले जाते, त्यामुळे काही दुकानदारांकडून सुद्धा मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार या अहिल्यानगर शहरात होत आहे.

या सर्वांचे कनेक्शन जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यापासून ते शहर पुरवठा अधिकाऱ्यांपर्यंत आहे. या संपूर्ण अधिकाऱ्यांची व रेशन दुकानदार व तसेच एजंट लोकांची साखळी असल्यामुळे नागरिकांची आर्थिक लूट व नुकसान होत आहे, असे देखील नितीन भुतारे यांनी निवेदनात म्हटले आहे. तरी संबंधित जिल्हा पुरवठा विभाग व शहर पुरवठा विभाग यांच्यावर कारवाई करून शहरांमध्ये पुरवठा विभागामध्ये शिस्त लावावी व रेशन कार्डची कामे एकही रुपया न मागता, न देता नियमानुसार लवकरात लवकर मुदतीत करून देण्यात यावी तसेच रेशन धारकांना त्यांचे धान्य संपूर्ण मिळावे, अशी मागणी नितीन भुतारे यांनी केली आहे.

जे रेशनधारक धान्य नागरिकांना देत नाही, अशा दुकानांवर कारवाई करण्यात यावी, त्याकरिता मागील संपूर्ण शहरातील रेशन दुकानदारांचे ऑडिट करून संपूर्ण चौकशी करून अहवाल आल्यानंतर हे सर्व झालेला भ्रष्टाचार स्पष्ट होईल व त्यातून दुकानदारांवर कारवाई करण्यात येईल. त्याकरिता आपण या दुकानदारांची ऑडिट करून चौकशी करावी. रेशन कार्ड दुरुस्ती करिता एजंटचा झालेला सुळसुळाट बंद करून नागरिकांना सुलभ कामे होतील, याची दक्षता घ्यावी अशीही मागणी नितीन भुतारे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

अहिल्यानगर शहरातील ज्या नागरिकांना रेशन कार्ड संबंधित अडचणी येत असतील त्यांनी ७३०४६१२१२१ या नंबर वर व्हाट्सअप तक्रार करावी.



नवशिक्षकांसाठी प्रेरणादायी प्रशिक्षणाचा समारोप करण्यात आला.

# नवशिक्षकांसाठी प्रेरणादायी प्रशिक्षणाचा समारोप

## कोकमठाण व अहिल्यानगर येथे ८२१ शिक्षकांचा सहभाग

नगर – राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने २५ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत कोकमठाण आणि अहिल्यानगर येथे नवनियुक्त शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा समारोप करण्यात आला. या राज्यस्तरीय प्रशिक्षणात एकूण ८२१ नवशिक्षकांनी सहभाग घेतला. कोकमठाणच्या आत्मा मलिक शैक्षणिक संकुलात ४०६ तर अहिल्यानगरच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये ४१५ शिक्षक उपस्थित होते.

डायटचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ अधिव्याख्याता आणि जिल्हा प्रशिक्षण समन्वयक अरुण भांगरे यांच्या नेतृत्वाखाली कोकमठाण येथील प्रशिक्षणाचा समारोप झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आत्मा मालिक ध्यानपीठाचे कोषाध्यक्ष विवेकानंद महाराज, उपाध्यक्ष बाळासाहेब गोरडे, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, कोपरगाव गटशिक्षणाधिकारी शबाना शेख, केंद्रप्रमुख महानुभव, सुलभक व शिक्षक भारती संघटना पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर, प्रशिक्षण सहायक अनमोल होन उपस्थित होते.


यावेळी कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक डॉ. अरविंद सगभोर यांनी केले. प्रशिक्षणासाठी योगदान देणारे सुलभक, मार्गदर्शक यांचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये अनमोल होन, महेश पाडेकर, चंद्रशेखर हासे, प्रकाश पारखे, डॉ. अरविंद सगभोर, ज्योत्स्ना खोजे, अभिजीत वाघ, जालिंदर गागरे, डॉ. शरद दुधाट, विजय देशमुख, वेरोनिका गायकवाड, कैलास वाघमारे, संजय गडकर, माधुरी ठुबे, सुनीता इंगळे, प्रतीक्षा काळे, वैशाली सोनवणे, मल्लिका शेख, कुलदीप गोसावी, शुभांगी भरसाकळ, भारती वक्ते, किरण बांडे, विजय कातडे, आदींचा समावेश होता.

समारोप प्रसंगी शाहिस्ता शेख, शुभम पवार आणि भगवान ढगे या प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण अनुभव शेअर करताना हे प्रशिक्षण उपयुक्त, संस्कारशील आणि मार्गदर्शक असल्याचे सांगितले.

समारोप कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशिक्षणार्थी स्वप्निल हारदे, अर्जुन सुरपल्ली, सचिन चव्हाण, अनिल म्हस्के यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सूत्रसंचालन प्रशिक्षणार्थी अनुजा आभाळे आणि सोनाली गोराडे यांनी केले. ब्रिजपाल सर यांनी आभार मानले.

# बालरंगभूमी परिषदेतर्फे जल्लोष लोककलेचा, जिल्हास्तरीय नृत्य, गीतगायन व वाद्यवादन स्पर्धा

नगर – लोककलांचा प्रगल्भ वारसा असलेल्या आपल्या महाराष्ट्रात लोककलांना उर्जितावस्था प्राप्त व्हावी, यासाठी बालरंगभूमी परिषदेने स्वतःची एक स्वतंत्र भूमिका स्वीकारली आहे. केवळ महोत्सवी किंवा मनोरंजनात्मक असे स्वरुप न ठेवता ही लोकचळवळ व्हावी, लोककलांची माहिती व महती बालकांपर्यंत पोहचवितांना गायन, वादन, नृत्य क्षेत्रात ज्ञान व कौशल्य प्राप्त करुन, लोककलेबाबत जिज्ञासा निर्माण व्हावी यासाठी बालरंगभूमी परिषदेतर्फे जल्लोष लोककलेचा महोत्सव १६ नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात आला. या महोत्सवात लोकनृत्य (समूह/एकल), लोकगीत (समूह/एकल), लोकवाद्य (एकल) प्रकारांचा समावेश असेल. प्रत्येक कलाप्रकाराचे स्वतंत्र सादरीकरण अपेक्षित असून सादरीकरण कालमर्यादा समूह लोकनृत्य व समूह लोकगीतासाठी कमीतकमी ६ मिनिटे ते ८ मिनिटे तर एकल साठी ३ मिनिटे ते ५ मिनिटे कालमर्यादा असेल. समूह/सांघिक सादरीकरण करणाऱ्या संघात किमान ६ व जास्तीत जास्त १० बालकलाकार असणे आवश्यक आहे.या महोत्सवात वय वर्ष ६ ते १५ वर्षाच्या बालकांना सहभागी होता येईल असे परिषदेचे अध्यक्ष प्रसाद भणगे यांनी सांगितले.




महोत्सवात शाळा, संस्था आणि मान्यताप्राप्त नृत्य/संगीत संस्था सहभागी होऊ शकतील, निर्धारित प्रवेश अर्ज भरून, संस्थेच्या लेटरहेड सोबत मुख्याध्यापक / संस्थाप्रमुख /संघप्रमुखांच्या सही शिक्क्यानिशी महोत्सवात प्रवेश घ्यावा लागेल.एकल कलाप्रकारासाठी रु.२०० तर समूह कलाप्रकारासाठी रु.५०० इतकी अनामत रक्कम जिल्हा शाखेच्या बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

जिल्हानिहाय आयोजित होणाऱ्या या महोत्सवात गतवर्षी राज्यातील ४० हजाराहून अधिक बालकांनी गायन, वादन व नृत्य या तिन्ही प्रकारात आपले कौशल्य दाखवत उत्तमरित्या सादरीकरण केले होते असे प्रतिपादन कोषाध्यक्ष श्रीमती सोनाली दरेकर यांनी केले.

सदर स्पर्धेचे म.ए.सो.चे रेणावीकर विद्यालय, अहिल्यानगर येथे आयोजन केले असून स्पर्धेच्या अधिक माहिती साठी सोनाली दरेकर : ७७२००००८३५, सागर अलचेट्टी : ९६३७१३९५५२ यांना संपर्क करून जिल्ह्यातील सर्व बालकलाकारांनी सहभागी होत स्मृतिचिह्न व रोख पारितोषिकांची लयलूट करून स्पर्धा यशस्वी करण्याचे आवाहन अहिल्यानगर शाखेतर्फे करण्यात आले आहे.

## अपार्टमेंटच्या पार्किंगमधून मोटारसायकलची चोरी

नगर – शहराजवळील कॉटेज कॉर्नर रोड वरील गोकुळनगर भागातील शनिराज अपार्टमेंटच्या पार्किंग मध्ये लावलेली होंडा कंपनीची ॲक्टीवा मोपेड (क्र.एमएच १६ सी एन ६६३१)अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ ते २ नोव्हेंबर रोजी दुपारी १ या कालावधीत घडली. याबाबत प्रतिभा सुभाष काळे (रा. शनिराज अपार्टमेंट, गोकुळनगर) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## सीए फायनल परिक्षेत श्रद्धा चिंचोले उत्तीर्ण



नगर – दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टन्टस ऑफ इंडिया नवी दिल्ली यांच्या वतीने सप्टेंबर मध्ये घेण्यात आलेल्या सीए अंतिम परीक्षेत शाहूनगर, सावेडी येथील श्रद्धा चिंचोले ही उत्तीर्ण झाली. ती याअगोदर सीएमए या परीक्षेत देखील उत्तीर्ण झाली आहे. तिचे शालेय शिक्षण सेंट विवेकानंद शाळेत तर महाविद्यालयीन शिक्षण पेमराज सारडा महाविद्यालयात झाले आहे. तिची आर्टिकलशिप डी. के. काळे अँड कंपनी व सीए रोहन बारस्कर यांच्याकडे झाली. तिला सीए पवन दरक यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तिचे वडील चंद्रकांत चिंचोले हे सन फार्मा कंपनीत नोकरीस आहेत तर आई सौ. अर्चना चिंचोले ह्या गृहिणी आहेत.

## सीए फाइनल परीक्षेत सार्थक बरमेचा उत्तीर्ण



नगर – दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टन्टस ऑफ इंडिया नवी दिल्ली यांच्या वतीने सप्टेंबर मध्ये घेण्यात आलेल्या सीए अंतिम परीक्षेत येथील सार्थक बरमेचा उत्तीर्ण झाले. सार्थकची आर्टिकलशिप सीए अभय भंडारी आणि सीए अजय गांधी, बंधू सीए सुयश बरमेचा, सीए मोहन बरमेचा, वहिनी सौ. पुजा बरमेचा आणि समस्त बरमेचा परिवाराचे मार्गदर्शन मिळाले. सार्थक हा बरमेचा परिवार मधील आठवा चार्टड अकाउंटट आहे. स्व. संपतलाल, स्व. सौ. रंजनाबाई यांची इच्छा सार्थकने सीए परिक्षा उत्तीर्ण होवून पूर्ण केली. कर सल्लागार सोहनलाल संपतलाल बरमेचा व सौ. सुवर्णा बरमेचा यांचे तो मुलगा आहे.

# पोलिस अधिकाऱ्यांच्या ‘जिल्ह्यांतर्गत बदल्या’

नगर – स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता कधीही लागू शकते, त्या पूर्वीच जिल्ह्यातील ९ पोलिस अधिकाऱ्यांच्या जिल्ह्यांतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत.यात ६ विनंती बदल्या तर ३ प्रशासकीय बदल्या करण्यात आल्या आहेत. शहरातील तोफखाना पोलिस ठाण्याचे पो.नि. आनंद कोकरे यांची मानव संसाधन विभागात बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी नियंत्रण कक्षातील पो.नि. जगदीश भांबळ यांना तोफखान्याचा पदभार देण्यात आला आहे.

जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी ४ नोव्हेंबर रोजी दुपारी हे बदल्यांचे आदेश काढले आहेत. अहिल्यानगर जिल्हा पोलिस आस्थापना मंडळाची बैठक १ नोव्हेंबर रोजी पोलिस अधिक्षक घार्गे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत विनंती बदल्या व प्रशासकीय बदल्यांबाबत चर्चा करण्यात आली होती. त्यानुसार संगमनेर शहर चे पो.नि. रवींद्र देशमुख यांची ए.एच.टी.यु. अहिल्यानगर, पारनेरचे पो.नि. समीर बारवकर यांची संगमनेर शहर, जिल्हा विशेष शाखेतील पो.नि. संतोष खेडकर यांची पारनेर, जामखेड चे स.पो.नि. नंदकुमार सोनवलकर यांची बेलवंडी, कोपरगाव शहरचे स.पो.नि.किशोर पवार यांची राजूर, राजूर चे स.पो.नि.दीपक सरोदे यांची पारनेर येथे विनंती बदली करण्यात आली आहे.

प्रशासकीय बदल्यांमध्ये नियंत्रण कक्षातील पो.नि. जगदीश भांबळ यांची तोफखाना, तोफखान्याचे पो.नि. आनंद कोकरे यांची मानव संसाधन विभागात तर बेलवंडी येथील स.पो.नि. संतोष भंडारे यांची जिल्हा विशेष शाखेत बदली करण्यात आली आहे.

# फॅन्सी ड्रेस स्पर्धेमुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना

## उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांचे प्रतिपादन, स्नेहबंधच्या फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे पारितोषिक वितरण



स्नेहबंधच्या फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, स्नेहबंध चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, एकनाथ जगताप, सोमेश्वर आव्हाड, विलास बिडवे.

नगर – नवरात्रीनिमित्त स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय फॅन्सी ड्रेस स्पर्धेमुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो, शिवाय त्यांच्यात स्टेज डेरींगही येते. ही स्पर्धा म्हणजे स्तुत्य उपक्रम आहे, असे प्रतिपादन उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांनी केले.

स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय फॅन्सी ड्रेस स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, सेवानिवृत्त माजी प्राचार्य एकनाथ जगताप, सोमेश्वर आव्हाड, विलास बिडवे, पत्रकार संजय सावंत, पियूष शिंदे, स्वयंम बास्कर, अंकुश गोत्राळ, प्रथमेश राठोड आदी उपस्थित होते.

उपवनसंरक्षक सालविठ्ठल म्हणाले, मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने डॉ. शिंदे यांनी ही स्पर्धा आयोजित केली. त्यांच्या हा उपक्रम चांगला आहे. यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो. ही स्पर्धा म्हणजे मुलांसाठी भविष्यात एखाद्या मोठ्या संधीचा पाया आहे.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, स्नेहबंधच्या वतीने दरवर्षी मुलांसाठी किल्ले बनवा, निबंध स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या सर्वच स्पर्धांना मुलांचा मोठा प्रतिसाद मिळतो. या स्पर्धेमधून उद्याचा कलावंत, लेखक घडवा, अशी अपेक्षा आहे. या स्पर्धेतील मुलांना सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र व डायरीचे वाटप करण्यात आले.

प्रास्ताविक व आभार सेवानिवृत्त माजी प्राचार्य एकनाथ जगताप यांनी मानले.

फॅन्सी ड्रेस स्पर्धेतील विजेते – गट– १ ते ५ वर्षे : प्रथम– शरण्या शुभम नांगरे, द्वितीय : हितार्थ सौरभ शिंदे, तृतीय अव्दैत शुभम बिडवे. गट ५ ते १२ वर्षे : प्रथम : लक्ष्मी प्रकाश लोखंडे, द्वितीय : शिवांश अतुल खामकर, तृतीय : मनंश महेश आळकुटे.



प्रारण चित्रपटात सहभागी झालेले अहिल्यानगर येथील कलाकार.

# प्रारण चित्रपटात अहिल्यानगरमधील कलाकार

## नोव्हेंबर महिन्यात प्रदर्शित होणार

नगर – लेखक मयूर परदेशी (श्रीरामपूर) यांनी ६ वर्षांच्या प्रदीर्घ अभ्यासानंतर साकारलेला प्रारण हा चित्रपट नोव्हेंबर महिन्यात चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाची संकल्पना मयूर परदेशी यांची असून, मच्छिंद्र परदेशी यांची निर्मिती आहे. डी ये फिल्म प्रस्तुत या चित्रपटाचे चित्रिकरण अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर व संगमनेर या तालुक्यांत करण्यात आलेले आहे.

या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये अहिल्यानगर जिल्हयामधील कलाकार मंडळींनी भूमिका साकारल्या आहेत. रोहन वाघमारे, सुशांत जाधव, श्रीशा आकडकर, अनुजा शिंदे, कल्पेश शिंदे, श्रीरामपूरचे रत्नाकर कोरडे गुरू पुजारीच्या भूमिकेत, तसेच साईराज सरडे, संजीवनी, मयूर राव व गायिका उज्ज्वल कुलकर्णी मुख्य भूमिकेत आणि बाळासाहेब ढमाले मामाच्या भूमिकेत आहेत. चित्रपटासाठी सुफी गायक पवन नाईक, श्वेता नाईक, माधुरी नाईक, श्रीकांत नाईक, अपर्णा नाईक, पंकज नाईक, आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. अक्षय वैद्य, डॉ. संजीवनी कराळे, ज्ञानदीप विद्यालय, वाळुंज येथील शिक्षक, जनता विद्यालय, रुईछत्तीशी येथील शिक्षक, आनंदऋषीजी विकलांग शाळेचे बारवकर सर, कीर्तनकार मनोहर इनामदार, पार्वती इनामदार, सविता जोशी, मारुती सराफ, स्वाती सराफ, दीपक जाधव यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शिक्षकांचे कौशल्य वृद्धी करण्याचा शासनाचा उपक्रम

नगर – महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास असोसिएशनच्या (MSFDA) वतीने पाच दिवसीय कार्यशाळेचे आयोजन पुणे येथे करण्यात आले होते. या काळात महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील साधारण ३० शिक्षकांनी सहभाग घेतला. यामध्ये नांदेड, अमरावती, नांदेड, मुंबई, कोल्हापूर, पंढरपूर, जालना अशा विविध भागातून शिक्षकांनी यात सहभाग घेतला. यामध्ये शिक्षकांच्या कौशल्यामध्ये वाढ करण्यासाठी विविध विषयांचे आयोजन करण्यात आले. फाईन आर्ट, परफॉर्मिंग आर्ट पुरातत्त्व विषय, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने आवश्यक ते मार्गदर्शन, विद्यार्थी केंद्रित शिक्षण, गुणवत्ता तपासणीसाठी आवश्यक गोष्टी अशा विविध विषयांचे यावेळी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेत प्रात्यक्षिकांवर देखील भर देण्यात आला. या विषयांचा आपल्या शिकवण्यामध्ये कसा उपयोग करता येईल याचा अनुभव आला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात ए आय याचा प्रभावी वापरआपल्या शिक्षणात कसा करता येईल यावर देखील भर देण्यात आला फक्त थेरी न कर शिकवता प्रात्यक्षिकांमुळे शिक्षकांना या मार्गदर्शनाचा निश्चितच लाभ होईल.

कुठल्याही परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांमधील कौशल्य वाढवण्यासाठी शिक्षकांनी अशा नवीन उपक्रमामध्ये सातत्याने सहभाग घेतला पाहिजे असे मत अहिल्यानगर येथील आय एम एस या व्यवस्थापन संस्थेतील प्राध्यापक विजय शिंदे यांनी व्यक्त केले. हे प्रशिक्षण पूर्णतः शिक्षकांच्या कौशल्य वाढीसाठी असल्याने जास्तीत जास्त शिक्षकांनी यात सहभाग घेतला पाहिजे. शासनाचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास पात्र आहे.



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास असोसिएशनच्या वतीने पाच दिवसीय कार्यशाळेचे आयोजन पुणे येथे करण्यात आले होते.

